दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२९२ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, गुरुवार, ११ एप्रिल २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

## ठाणेकरांना गिफ्ट!

## ठाणे, विरारसह 'या' ठिकाणी नवीन स्टेशनचे काम सुरू



■ठाणे, विशाल कारंडे :

महाराष्ट्रात आगामी काळात बुलेट ट्रेनचं जाळं उभारलं जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर पालघर आणि ठाणे जिल्ह्यात बुलेट ट्रेनच्या कामांना सुरुवात झाली आहे. हा प्रकल्प ५०८ किमी लांबीच्या मुंबई-अहमदाबाद कॉरिडोअरचा (NHSRCL) एक भाग असल्याची माहिती नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने दिली आहे NHSRCL ने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, या प्रकल्पाचं काम शिळफाटा ते महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील झरोली गावापर्यंत विस्तारणाऱ्या बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या पॅकेज-Ct चा भाग म्हणून केलं जात आहे. या १३५ किमी लांबी पट्टयाच्या कामासाठी -तांत्रिक तपास पूर्णत्वाकडे आहे. तसंच या ठिकाणांवर दोन पर्वतीय बोगद्यांचे कामही सुरू झालं आहे. अनेक ठिकाणी खांब उभारण्याचं काम सुरू झालं असल्याचं सांगण्यात आलं आहे. गर्डर्सच्या पूर्ण स्पॅन आणि सेगमेंट कास्टिंगसाठी कास्टिंग यार्ड विकसित केले जात असल्याची माहिती प्रसिद्धीपत्रकात देण्यात आली आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पाचं पॅकेज C-३ १३५.४५ किमी लांब आहे. त्यात २४.०२७ किमी लांबीचे मार्ग आणि पूल आहेत. या प्रकल्पात ५.३६१ किमी भूभाग वापरला जात आहे. यामध्ये १२ स्टील पुलांसह ३६ पूल आणि क्रॉसिंगचा समावेश आहे, असं NHSRCL ने सांगितलं आहे. याशिवाय, या प्रकल्पामध्ये सहा पर्वतीय बोगदे आणि एक कट-अँड-कव्हर बोगदादेखील असणार आहे. उल्हास, वैतरणा आणि जगनी नद्यांवर क्रॉसिंगही असेल असं प्रसिद्धीपत्रकात सांगितलं आहे. या सेक्शनमध्ये ठाणे, विरार आणि बोईसरदरम्यान तीन बुलेट ट्रेन स्थानकं येतील.

याशिवाय, ठलरफळछ ने प्रकल्पाचा एक भाग म्हणून समुद्राखालील पहिल्या बोगद्याचं बांधकाम सुरु केलं आहे. या बोगद्याची लांबी २१ किमी असेल. वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स आणि शिळफाटा येथे भूमिगत स्थानकांदरम्यान हा पट्टा असेल अशी माहिती देण्यात आली आहे. बोगद्यांसाठी तीन बोरिंग मशीन्सचा वापर केला जात आहे. या मशीन्सचा वापर सुमारे १६ किमी भागासाठी केला जात आहे. २१ किमीपैकी उर्वरित ५ किमीसाठी न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग पद्धत (NATM) वापरली जाणार आहे. मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल कॉरिडोअर प्रकल्पासाठी एकूण १.०८ लाख कोटी खर्च होणार आहेत. शेअरहोल्डिंग पद्धतीनुसार, भारत सरकार NHSRCL ला १० हजार कोटी रुपये देणार आहे. यामध्ये गुजरात आणि महाराष्ट्र या दोन राज्यांचा समावेश असून ते प्रत्येकी ५००० कोटी रुपये देतील. उर्वरित रक्कम जपानकडून ०.१ टक्के व्याजाने कर्जाद्वारे दिली जाणार आहे अशी माहिती प्रसिद्धीपत्रकात देण्यात आली आहे.

## पश्चिम रेल्वेने हार्बर मार्गावर लोकल ट्रेन आता बोरिवलीपर्यंत धावणार




■मुंबई, दिगंबर जाधव :

मुंबईकरांसाठी आनंदाची बातमी हाती आली आहे. पश्चिम रेल्वेने हार्बर मार्गावर लोकल ट्रेन आता बोरिवलीपर्यंत धावणार आहे. त्यामुळे हार्बर रेल्वेचा मार्ग ८ किलोमीटरने वाढणार आहे. या प्रकल्पाचं काम २०२७-२८ या वर्षात पूर्ण होणार आहे. हार्बर मार्ग बोरिवलीपर्यंत विस्तारीकरण केल्याने पश्चिम मार्गावरील अंधेरी आणि बोरिवली स्टेशनदरम्यानची लोकलमधील गर्दी कमी होण्यास मदत मिळणार आहे. या प्रकल्पासाठी निविदा मे महिन्यात जारी होण्याची शक्यता आहे. तर या प्रकल्पाचं काम १५ जूनपासून सुरु होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पाचं काम दोन टप्प्यात होणार आहे. या प्रकल्पासाठी ८२५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात गोरेगाव ते मालाडपर्यंत स्टेशनचा विस्तार होणार आहे. तर त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात ५ किलोमीटरचं काम पूर्ण होईल. त्या टप्प्यात मालाड ते बोरीवली या स्टेशनपर्यंत काम पूर्ण होईल,अशी माहिती पश्चिम रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितली. सध्या हार्बर मार्गावर लोकल ट्रेन या सीएसएमटी ते गोरेगाव स्टेशनपर्यंत रेल्वेसेवा सुरु आहे. मागच्या वेळी हार्बर मार्गावर अंधेरी ते गोरेगाव हा टप्पा वाढविण्यात आला होता. या टप्प्याचं काम २०१८ पर्यंत पूर्ण झालं होतं. दरम्यान, बोरिवलीपर्यंत हार्बर विस्तारीकरण करण्यासाठीचं प्राथमिक काम पूर्ण झालं आहे. या कामासाठी भू-तांत्रिक तपासणी, सर्वेक्षण, झाडांचे ड्रोन सर्वेक्षण आदी कामांचा समावेश आहे.

## निवडणूक काळात रात्री १० नंतर भोंगा बंद ठेवण्याचे निवडणूक आयोगाचे आदेश

■मुंबई, विशाल पाटील :

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर केंद्रीय निवडणूक आयोगाने रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत लाऊडस्पीकर, भोंग्यांच्या वापरावर मनाई केली आहे. अन्यथा सामुग्री जप्त करण्याची कारवाई करण्यात येणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचा धडाका सुरू झाला आहे. नेते व त्यांचे कार्यकर्ते प्रचारासाठी गल्लोगली पायपीट करत आहेत. नेत्याचा 'आवाज' जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी कानठळ्या बसतील, अशा आवाजात लाऊडस्पीकर लावण्यात येतो. प्रचारात सामान्यांची झोपमोड होऊ नये व पर्यावरणाला हानी पोहचू नये, यासाठी आदेश काढला आहे.

**-ध्वनिप्रदूषण नियमांचे उल्लंघन झाल्यास कारवाई**

. प्रचारासाठी रात्री-बेरात्री लाऊडस्पीकर लावून सामान्यांना त्रास देतात. त्यामुळे केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणूक प्रचारादरम्यान लाऊडस्पीकरच्या वापराबाबत नियम घातले आहेत. या नियमांचा नेते, त्यांचे कार्यकर्ते भंग करतात की नाही, ही पाहण्याची जबाबदारी राज्य सरकार व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळावर




सोपविण्यात आली आहे. . वाहनात स्पीकर बसवून प्रचार करण्यात येणार असेल, तर त्याची नोंद संबंधित प्राधिकरणाकडे करणे बंधनकारक आहे. तशी नोंद केली नसल्यास संबंधित वाहन आणि स्पीकर जप्त करण्यात येईल. ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन करण्यात आले तर एमपीसीबी नियमानुसार कारवाई करण्यास मोकळी आहे.

## पुण्याच्या आयटी हबमध्ये अदानी ने २५ एकर जमीन घेवून केली मोठी गुंतवणूक




■पुणे, प्रतिनिधी :

महाराष्ट्राचे औद्योगिक शहर आणि आयटी हब म्हणून पुण्याची ओळख आहे. आता याच पुण्याच्या आयटी हबमध्ये अदानींचे डेटा सेंटरही असेल. अदानी समूहाची कंपनी टेराविस्टा डेव्हलपर्सने यासाठी पुण्यातील हवेली परिसरात २५ एकरहून अधिक जागा घेतली आहे. ही जमीन पिंपरी औद्योगिक क्षेत्रात आहे. ही जमीन फिनोलेक्स इंडस्ट्रीजची होती. या जमिनीचे भाडेपट्ट्याचे अधिकार घेण्यासाठी कंपनीने सुमारे ४७१ कोटी रुपये खर्च केले आहेत. या जमिनीत डेटा सेंटर विकसित करण्यात येणार आहे. या महिन्याच्या सुरुवातीला जमिनीचा हा व्यवहार झाला. हा करार ३ एप्रिल रोजी नोंदणीकृत झाला आणि समूह कंपनी टेराविस्टा डेव्हलपर्सने त्यासाठी २३.५२ कोटी रुपये मुद्रांक शुल्क भरले. खरेदी केलेली जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्वस्तिक रबर प्रोडक्टला भाडेतत्त्वावर दिली होती. जगभरात डेटा सेंटर व्यवसाय हा उदयोन्मुख व्यवसाय मानला जातो. अदानी समूहाने या व्यवसायासाठी मोठी योजना तयार केली आहे. यासाठी अदानी समूहाची प्रमुख कंपनी अदानी एंटरप्रायझेसने एजकॉनेक्ससोबत संयुक्त उपक्रम स्थापन केला आहे. दोघांची खश अदानी कोनेक्समध्ये ५०-५० टक्के हिस्सेदारी आहे. ही कंपनी आधीच चेन्नई, नवी मुंबई, नोएडा, विशाखापट्टणम आणि हैदराबाद सारख्या शहरांमध्ये डेटा सेंटर तयार करण्याचे काम करत आहे. खश ने पुढील दशकात १ गिगावॅट क्षमतेच्या डेटा सेंटरचे नेटवर्क तयार करण्याची योजना आखली आहे. जागतिक संस्थात्मक गुंतवणूकदार आणि भारतीय कंपन्यांसाठी भारतातील डेटा सेंटर सर्वात आकर्षक वाढीची संधी म्हणून उदयास येत आहेत. डेटा सेंटर मार्केटमध्ये गुंतवणुकीचा प्रवाह येत आहे, ज्यामुळे एकाच वेळी अनेक नवीन बाजारपेठा निर्माण होत आहेत. देशात डेटा सेंटर डेव्हलपमेंटसाठी आतापर्यंत एकूण १३.५ बिलियन डॉलरपेक्षा जास्त गुंतवणुकीची योजना आखण्यात आली आहे.

## ओशो इंटरनॅशल फाउंडेशनला उच्च न्यायालयाचा दणका

■पुणे, अभिजीत येरुल्लू :

पुण्यातील कोरेगाव पार्क येथील ओशो आश्रमाची जागा १०७ कोटी




किमतीला विकण्याची परवानगी नाकारण्याच्या संयुक्त धमार्दाय आयुक्तांच्या आदेशाला आव्हान देणारी ओशो इंटरनॅशल फाउंडेशनची याचिका उच्च न्यायालयाने फेटाळ्ली. डिसेंबर २०२३ मध्ये संयुक्त धमार्दाय आयुक्तांनी ओशो फाउंडेशनची याचिका फेटाळ्ली होती. कोरेगाव पार्क येथील जमीन विकण्यासाठी भाग पाडणारी परिस्थिती नाही, असे म्हणत न्या. गिरीश कुलकर्णी व न्या. फिरदोश पुनीवाला यांच्या खंडपीठाने धमार्दाय आयुक्ताने दिलेला निर्णय योग्य ठरविला. याचिका फेटाळ्ल्यानंतर न्यायालयाने राजीवनयन राहुलकुमार बजाज रुषभ फॅमिली ट्रस्टने जमीन खरेदीसाठी आगाऊ रक्कम म्हणून दिलेले ५० कोटी बिनव्याजी परत करण्याचे निर्देश ओशो फाउंडेशनला दिले. न्यायालयाला दिली. धमार्दाय आयुक्तांनी ओशो आश्रमाचे ऑडिट करण्याचे दिलेले निर्देशही योग्य ठरविले. ओशो इंटरनॅशनल फाउंडेशनचे २००५ ते २०२३ या कालावधीचे विशेष ऑडिट करावे. दोन विशेष ऑडिटर हे ऑडिट करतील. त्यांची नियुक्ती सहाय्यक धमार्दाय आयुक्त, बृहन्मुंबई क्षेत्र, करतील. आदेशाची प्रत उपलब्ध झाल्यावर ऑडिटरची नियुक्ती करण्यात येईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

## महापालिका मुख्यालयात फायलींचे गट्ठे पाहून आयुक्त अँक्शन मोडमध्ये

■नवी मुंबई, भावना जैन :

महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी मुख्यालयामधील विविध कार्यालयांची पाहणी केली. ठिकठिकाणी पडलेले फायलींचे गठ्ठे पाहून नाराजी व्यक्त केली. स्वच्छतेबरोबर नीटनेटकेपणाला प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या. प्रत्येक कर्मचाऱ्यांकडे जॉब कार्ड लिखित स्वरूपात देण्यात यावे. पुढील आठवड्यात पुन्हा पाहणी करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. महानगरपालिका आयुक्तांनी बैठकांसह प्रत्यक्ष स्थळपाहणीचा सपाटा लावला आहे. रुग्णालयांसह शाळांना भेटी दिल्यानंतर



महानगरपालिका मुख्यालयातील विविध कार्यालयांची पाहणी केली. कार्यालयांमध्ये ठिकठिकाणी फायलींचे गठ्ठे पाहून त्यांनी नाराजी व्यक्त केली. फाईल ठेवण्याच्या पद्धतीमध्ये बदल करण्याच्या सूचनाही यावेळी केल्या. स्वच्छता व नीटनेटकेपणाला प्राधान्य देण्यात यावे, अशा सूचना कर्मचाऱ्यांना दिल्या असून पुढील आठवड्यात पुन्हा पाहणी करणार असल्याचा इशाराही दिला आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याकडे त्याच्याकडील जबाबदारीचे स्वरूप लिखित स्वरूपात असणे आवश्यक आहे. जॉब चार्ट असलेच पाहिजे. कागदपत्र व नस्ती ठेवण्याची पद्धती शासकीय नियमावलीप्रमाणे असावी. फाईलसाठी कपाटांची संख्या वाढविण्याऐवजी जागेची उपलब्धता लक्षात घेऊन कॉम्पॅक्ट सिस्टीम कार्यान्वित करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. प्रत्येक विभागाचे डिजिटलायझेशन करून कामकाजाला गती द्यावी. केंद्रीय आवक-जावक कक्षामध्येही सर्व पत्रांची संगणकीय नोंद करण्यात यावी. पुढील कार्यवाहीचीही ई-ऑफिस पद्धतीमध्ये नोंद होणे आवश्यक आहे. कागदपत्रांचा वापर कमी करण्यासाठी विषयपत्रिका व इतिवृत्तही डिजिटल स्वरूपात करावीत. नगररचना विभागातील नकाशे व रेकॉर्ड यांचेही अत्याधुनिक पद्धतीने जतन करावे. ऑनलाइन परवाने देण्याची पद्धतही गतिमान करावी. प्रत्येक भूखंडाची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होईल, अशी यंत्रणा तयार करून परवाने संदभार्तील हवी असलेली माहिती त्वरित देण्यासाठी डॅशबोर्ड बनविण्याच्या सूचना केल्या. तसेच तळमजल्यावर हिकरणी कक्ष ठेवण्याची सूचना केली. महानगरपालिका मुख्यालयाच्या तळमजल्यावर वैद्यकीय कक्ष तयार करावा. तेथे डॉक्टर उपलब्ध करून देण्यात यावा. मुख्यालयात एक रुग्णवाहिकाही उपलब्ध असावी, अशा सूचना आयुक्तांनी केल्या. प्रत्येक मजल्यावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी व त्याविषयी फलक लावण्यात यावेत, अशा सूचनाही यावेळी केल्या.

## खाडी किनारी वाळू माफिया सक्रिय, भरारी पथकाने कारवाई करत केल्या ४ बोटी नष्ट

■वसई, सचिन कदम :

विरारच्या किनारपट्टीवर पुन्हा वाळू माफिया सक्रिय झाले आहेत. मंगळवारी जिल्हा खनिकर्म अधिकारी आणि भरारी पथकाने संयुक्त कारुई करून विरार जवळील काशीद कोपर येथे अनधिकृत रेती उत्खनन करणाऱ्या एकूण ४ बोटी जप्त केल्या. नंतर या बोटी आणि सक्शन पंप जिलेटीनच्या सहाय्याने नष्ट करण्यात आल्या. वसई विरार बहुतांश भाग हा किनारपट्टीचा परिसर आहे. विरार जवळील भागात वैतरणा व शिरगाव, नारिंगी खाड्यामध्ये छुप्या मार्गाने सक्शन पंप लावून वाळू उपसा होत असतो. या भागत वाळू माफिया पुन्हा सक्रिय झाले आहेत. मंगळवारी खनिकर्म अधिकारी व मंडळ अधिकाऱ्यांच्या संयुक्त पथकमे काशिदकोपर किनाऱ्यावर



छापा घातला. कारवाईची कुणकुण लागताच वाळू माफिया फरार झाले. मात्र पथकाने अनधिकृत रेती उत्खनन करणाऱ्या ४ बोटी जप्त केल्या. या ४ बोटी आणि वाळू उत्खनन करण्यासाठी वापरला जाणारा सक्शन पंप जिलेटीनच्या सहाय्याने स्फोट करून नष्ट करण्यात आल्या. भरारी पथकातील जिल्हा खनिकर्म अधिकारी संदीप पाटील, अधिकार शुल्क निरीक्षक मारोती सुर्यवंशी, मंडळ अधिकारी सुशांत ठाकरे विजयकुमार मींड, विलास पाटील, अनिकेत काळेल आदींच्या पथकाने ही कारवाई केली. या किनारपट्टीच्या लगत व खाडी किनारी मोठ्या प्रमाणात कांदळवनांची वृक्ष आहेत. यामुळे किनाऱ्यावरील जैवविविधता व पर्यावरण संतुलन होण्यास मदत होते. मात्र मागील काही वर्षापासून या किनारपट्टी लगत मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वाळू उपसा केला जाऊ लागला आहे. याचा मोठा परिणाम हा विविध भागावर होऊ लागला आहे. विरार जवळील वैतरणा खाडीतही मागील काही वर्षांपासून छुप्या मार्गाने बेकायदेशीर वाळू उत्खनन केले जाते. याचा परिणाम हा खाडीत व खाडी किनारी असलेल्या कांदळवन क्षेत्रावर होऊ लागला आहे. सक्शन पंप लावून हे उत्खनन होत असल्याने हळू हळू खाडी जवळील भाग खचू लागला आहे.

## हिंदुस्थानची पुढची अंतराळ संशोधन मोहीम 'चांद्रयान - ४'

■नवीदिल्ली, प्रगती शर्मा:

हिंदुस्थानने चांद्रयान -३ यशस्वी करत अंतराळ क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटवला आहे. या यशस्वी मोहिमेनंतर आदित्य एल- १ ही सूयार्ची माहिती मिळवण्याची मोहिमही यशस्वी होत आहे. आता हिंदुस्थानने आपले पुढचे लक्ष्य निधार्रीत केले असून इस्त्रोचे अध्यक्ष एस. सोमनाथ यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. इस्त्रो चांद्रयान -४ मोहिमेवर काम करत असून २०२४ पर्यंत हिंदुस्थानी व्यक्ती चंद्रावर उतरवण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे, अशी माहिती एस सोमनाथ यांनी दिली. अंतराळ संशोधन ही सातत्याने सुरू असणारी




प्रक्रिया आहे. देश झपाट्याने या क्षेत्रात प्रगती करत आहे. आता आम्ही चांद्रयान ४ मोहिमेवर काम करत आहोत. या मोहिमेद्वारे २०४० पर्यंत चंद्रावर हिंदुस्थानी व्यक्तीला उतरवण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे. त्यासाठी इस्त्रो तयारी करत आहे. या मोहिमेसाठी चंद्राबाबत अधिक माहिती मिळवत यश मिळवण्यात येणार आहे. तसेच या मोहिमेद्वारे चंद्रावरील माती आणि धातूनचे नमुने मिळवून ते आणून अधिक संशोधन करण्यात येणार आहे. त्यामुळे हिंदुस्थानच्या चांद्रयान ४ मोहिमेनंतर चंद्राबाबत अधिक माहिती मिळणार असून संशोधनाला नवी दिशा मिळेल, असेही सोमनाथ यांनी सांगितले. हिंदुस्थानने १४ जुलै २०२३ रोजी चांद्रयान ३ मिशन लॉंच केले होते. २३ ऑगस्टला चांद्रयान ३ चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरले होते. तसेच चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उथरणार हिंदुस्थान हा पहिला देश ठरला होता. या मोहिमेने अंतराळ क्षेत्रात हिंदुस्थानची मोहर उमटवली. या यशस्वी मोहिमेनंतर इस्त्रोच्या एस. सोमनाथ यांनी पुढील महत्त्वाकांक्षी योजनेची माहिती दिली आहे.

## बदलापूर नागरिकांना रेल्वेसह मेट्रोचीही सुविधा देणार, उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे आश्वासन

■ ठाणे, नितीन देवळेकर :

मुंबई आणि उपनगरातील बदलापूरपर्यंत विस्तारित झालेल्या भागाला रेल्वेच्या सुविधा मिळाव्यात, यासाठी येथील नागरिक आग्रही आहेत. रेल्वेची सुविधा उत्तम दर्जाची देण्याबरोबरच



या भागात राहणाऱ्या नागरिकांसाठी मेट्रोचीही सेवा लवकरच उपलब्ध करून देणार असून त्याला येत्या काही दिवसात मंजुरी देणार असल्याचे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बदलापूरातील कार्यक्रमात दिले. मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांच्या बदलापूर येथील नवीन कार्यालयाचा शुभारंभ देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यालयाच्या उद्घाटनाबरोबरच कल्याण आणि भिवंडी लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ भव्य कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पंतप्रधान मोदी यांनी रेल्वे आणि मेट्रो सेवांवर विशेष भर दिला असून लवकरच बदलापूरचाही प्रश्न मार्गी लागेल. यासाठी राज्य शासनाकडून जी मदत लागेल, ती करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. तसेच नागरिकांना दळणवळण सोपे व्हावे, यासाठी मेट्रो सेवाही मंजूर करून ती सेवाही बदलापूर आणि उपनगरातील प्रवाशांना उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले. या मेळाव्याला भिवंडीचे उमेदवार कपिल पाटील, कल्याणचे उमेदवार डॉ. श्रीकांत शिंदे, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण व कल्याण परिसरातील विविध आमदार आणि महायुतीचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## भिवंडीत पिता पुत्राने घातला व्यापाऱ्याला ५५ लाखांचा गंडा




■ठाणे, यश सावंत

बाप नंबरी बेटा दस नंबरी या हिंदी चित्रपटाला शोभणारी हुबेहुब कथा भिवंडी शहरात घडल्याचे समोर आले आहे. मुंबईतील एका व्यापाऱ्याने त्याच परिसरात राहणाऱ्या त्याच्या अन्य दोघा साथीदार व्यापारी पिता-पुत्रावर विश्वासाने ५५ लाखांचा माल भाडेतत्त्वावर दिला असता त्या दोघांनी मालाचा अपहार केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी दोघांवर नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जयंतीलाल देढीया व जयेश जयंतीलाल देढीया अशी गुन्हा दाखल झालेल्या पिता-पुत्राची नावे असून पोलिसांनी दोघांना बेड्या ठोकल्या आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार जिगर बिपीन शहा (४०) यांचे वुड्स बॅागचा मोठा व्यवसाय आहे. तर आरोपी पिता-पुत्र हे मुलुंड पश्चिम भागात एका हायप्रोफाईल सोसायटीत राहतात. या आरोपी पिता-पुत्राची ओळख तक्रारदार व्यापारी जिगर यांच्याशी मार्च २०२३ मध्ये झाली. या ओळखीतून या दोघा आरोपी पिता-पुत्रांनी जिगर शहा यांच्याशी बाप नंबरी बेटा दस नंबरी या हिंदी चित्रपटासारखी चलाखी दाखवत व्यापारामध्ये भागीदारी करून विश्वास संपादन केला. दरम्यान, व्यापारी जिगर बिपीन शहाने त्याचे साथीदार व्यापारी आरोपी पिता-पुत्राकडे भिवंडीतील राहनाळ येथील जयेश स्टोरेज या ठिकाणी विश्वासाने ५५ लाख ३७ हजार ९०८ रुपये किमतीचा सिथेटिक रबर वूड्स व नॅचरल रबर वूड्सच्या बॅगांचा माल विश्वासाने सोपवला होता. मात्र त्यांनी या मालाची आजतागायत परतफेड केलेली नाही.

## भिवंडीतून 'हायवे रॅाबर' च्या टोळीकडून पिस्तुल, मिरचीपूडसह शस्त्रास्त्र जप्त

■ठाणे, रोहित जैसवाल :

भिवंडीतील तळवळी भागात वाहनांना अडवून दरोड्याचा प्रयत्न ात असलेल्या तिघांना निजामपूरा पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांच्याकडून देशी बनावटीची पिस्तुल, एअरगन, मिरचीपुड, फायटर, चाकू, दोरी असा मुद्देमाल जप्त केला आहे. गेल्याकाही दिवसांपासून भिवंडीत महामार्ग आणि मार्गावर वाहन चालकांना लुटणाऱ्या 'हायवे रॅाबर'च्या टोळ्या सक्रीय झाल्या



आहेत. त्यामुळे वाहन चालकांमध्ये भितीचे वातावरण आहे. दरोडेखोऱ्यांनी यापूर्वी किती जणांना लुटले आहे याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. भिवंडी शहरात मोठ्याप्रमाणात गोदामे आहेत. त्यामुळे विविध राज्यातील अवजड, जड वाहने रात्रीच्या वेळात शहरात प्रवेश करत असतात. मुंबई नाशिक महामार्ग किंवा मुख्य रस्त्यांवर जड, अवजड वाहन चालकांना आणि शेतकऱ्यांना लुटल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. मंगळवारी भिवंडी येथील कांबा तळवळी नाका या मार्गावर काही दरोडेखोर येणार असल्याची माहिती निजामपूरा पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने या भागात सापळा रचला. त्यावेळी पाच दरोडखोर येथे घात लावून बसल्याचे पोलिसांना आढळून आले. पोलिसांच्या पथकाने दरोडेखोरांना पकडण्याचा प्रयत्न केला. यातील दोन दरोडेखोर पळून गेले. तर उर्वरित तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांच्याकडून मोबाईल आणि दरोड्यासाठी लागणारे साहित्य जप्त केले. वाहन चालकांवर दरोडा टाकणार होतो अशी कबूली त्यांनी दिली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काही सोपे उपाय

**ताजेतवाने दिसण्यासाठी चेहरा स्वच्छ ठेवण्याची गरज असते. पण चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काय, किती आणि कसं वापरायला पाहिजे हे माहिती असणंही गरजेचं आहे. पाहू चेहरा स्वच्छ**



**फेसवॉश :** चेहरा स्वच्छ आणि टवटवीत ठेवण्यासाठी फेसवॉश गरजेचं आहे, पण त्वचेच्या प्रकृतीनुरूप योग्य फेसवॉश वापरला पाहिजे. हर्बल फेसवॉश सर्वात उत्तम. तरीही दिवसातून फक्त दोन वेळा फेसवॉश वापरा. जर आपण मेकअप करत नसाल तर रात्री झोपण्यापूर्वी फक्त पाण्यानेही चेहरा धुवू शकता. ▮ऑइली स्किनसाठी नीम, कोरफड, आणि मिंट फेसवाश योग्य विकल्प आहे. ▮ड्राय स्किनसाठी केसर, मिल्क आणि हनी फेसवॉश वापरू शकता. ▮डेड स्किनसाठी स्क्रब फेसवाश वापरणे योग्य ठरेल.

**कोमट पाणी :** फेसवॉशने चेहरा धुताना पाणी जास्त गरम नसलं पाहिजे याने स्किन खराब होते. त्वचेसाठी जास्त गार पाणीही योग्य नाही म्हणून ताज्या किंवा कोमट पाण्याने चेहरा धुवायला हवा.

**घासू नका :** चेहरा जास्त घासण्याने रंग गोरा दिसले हा विचार चुकीचा आहे. असे करणे हानीकारक ठरू शकतं. कारण अशाने त्वचेवरील नरम परत उतरते आणि स्किन कोरडी पडते. तसेच ज्यांना फेस वाइप्स वापरण्याची सवय असते त्यांनीही दिवसातून दोनपेक्षा जास्त

# डोळ्यांभोवती काळी वर्तुळे असण्यामागे असू शकतात ही कारणे



अनेकदा शारीरिक विश्रांती जर पुरेशी मिळत नसली, तर डोळ्यांभोवती काळी वर्तुळे दिसून येतात. मात्र केवळ शारीरिक थकवा आल्यानेच डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे येतात असे नाही, तर यासाठी इतरही अनेक कारणे असू शकतात.

काहींच्या डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे 'पिग्मेंटेशन' मुळे असू शकतात. हे पिग्मेंटेशन काहींच्या बाबतीत अनुवांशिक असू शकते. दक्षिण आशियाई लोकांमध्ये अशा प्रकारचे पिग्मेंटेशन दिसून येते. पिग्मेंटेशनमुळे जर डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे असतील, तर कितीही उपाय-उपचार केले तरी ही वर्तुळे हलकी होतात, पण नाहीशी होत नाहीत.

ज्या व्यक्तींना चेहऱ्यावरील त्वचेवर सोरायसिस किंवा एक्झिमा सारखे त्वचा विकार असतील, त्यांच्याही डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे दिसून येऊ शकतात. या दोन्ही विकारांमध्ये त्वचा लालसर, किंवा गडद रंगाची दिसू लागते. तसेच सतत खाज सुटत असल्याने ही त्वचा आणखीनच काळसर दिसू लागते. त्यामुळे जर डोळ्यांच्या आसपासच्या त्वचेवर एक्झिमा किंवा सोरायसिस असले, तर त्यामुळे डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे असल्याप्रमाणे



भासतात.

ज्या व्यक्तींना सतत डोळे चोळण्याची सवय असते, त्यांच्या डोळ्याच्या आसपासची त्वचा वारंवार चोळली गेल्यामुळे काळसर आणि काहीशी जाडसर दिसू लागते. वारंवार डोळे चोळल्याने डोळ्यांच्या आसपासची त्वचा रगडली जाते. त्यामुळे त्वचेच्या खाली असलेल्या रक्तपेशींना नुकसान पोहोचते आणि त्यामुळे त्वचा काळसर दिसू लागते.

अनेकदा डोळ्यांभोवती काळी वर्तुळे एखाद्या ॲलर्जीमुळेही असू शकतात. या वर्तुळांच्या जोडीनेच डोळ्यांच्या आसपास हलकी सूजही दिसून येते. त्यामुळे याचे निदान डॉक्टरांकडून करून घेऊन योग्य औषधोपचार आणि भरपूर विश्रांतीनंतर ही काळी वर्तुळे नाहीशी होतात.

शरीरामध्ये पाण्याची कमतरता झाल्यास, म्हणजेच डीहायड्रेशन झाल्यासही डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे दिसून येतात. एखाद्या आजारपणामुळे किंवा अतिरिक्त मद्यपानामुळे शरीरातील इलेक्ट्रोलाईट्स कमी होऊ लागतात, त्यामुळे डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे उद्भवतात. अशा वेळी पाण्याचे प्रमाण वाढवल्याने कालांतराने ही समस्या दूर होऊ शकते.

**पुदिन्याच्या पानांमुळे अनेक रोग दूर होतात. पुदिना चटणी जर समोशाबरोबर सेवन केली तर त्यामुळे चवच वाढते असे नव्हे तर पचनही चांगले होते. पुदिना वनस्पतीमुळे पोटात शांत वाटते व आग होत नाही.**

## पुदिना सर्दी, अन्नपचनावर उपयुक्त

**पुदिन्याची** पाने अन्नपचन, मुख आरोग्य, सर्दी यावर गुणकारी असल्याचा दावा तज्ज्ञांनी केला आहे. डाबर रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंटचे प्रमुख जेएलएन शास्त्री व सर गंगाराम रुग्णालयाचे वरिष्ठ आयुर्वेद सल्लागार परमेश्वर अरोरा यांनी संशोधनाअंती पुदिन्याचे अनेक उपयोग सांगितले आहेत. त्यानुसार पुदिन्यात अँटीऑक्सिडंट व फायटोन्यूट्रिअंट असतात त्यातून पोटातील स्नायूंना आराम मिळतो. पुदिन्याच्या पानांमुळे अनेक रोग दूर होतात. पुदिना चटणी जर समोशाबरोबर सेवन केली तर त्यामुळे चवच वाढते असे नव्हे तर पचनही चांगले होते. पुदिना वनस्पतीमुळे पोटात शांत वाटते व आग होत नाही. शरीराचे तापमान वाढत नाही. या सगळ्याचा संबंध डोकेदुखी व अर्धशिशी यांच्याशी असतो. मुख आरोग्यात पुदिना गुणकारी असून त्यात जंतुनाशक गुण असतात, परिणामी तोंडातील घातक जिवाणू मारले जातात व जीभ, दात स्वच्छ राहतात. पुदिना कफ व सर्दीवर उपयुक्त आहे. त्वचारोगांवरही पुदिना उपयोगी असून त्यामुळे त्वचेची आग कमी होते व कीटकदंश, इतर ॲलर्जीने होणारे दुष्परिणाम टळतात. पुदिना ही पचनासाठी उपयुक्त वनस्पती असून त्यामुळे गॅस होणे टळते, अपचन, उलट्या व अतिसारापासून संरक्षण मिळते. पुदिन्याची पाने पाण्यात काही तास भिजवून नंतर खावीत व त्याचा अर्क जास्त उपयुक्त असतो.



## सरबत बनवताना लक्ष देण्यासारख्या काही गोष्टी...

- ज्याचे सरबत बनवायचे त्याचा रस किंवा काढा १ वाटी, पाणी १ वाटी, साखर २ वाटी घ्यावी.
- पाणी व साखर एकत्र करून उकळावं.
- उकळी येऊन फेस शांत झाला व मिश्रण स्वच्छ दिसू लागलं की गॅस बंद करावा.
- त्यात आधी तयार करून ठेवलेला रस / काढा मिसळावा आणि ढवळावा.
- नंतर हे मिश्रण गाळून स्वच्छ, कोरड्या बरणीत भरून ठेवावं. यालाच सरबताचं 'कॉन्सन्ट्रेट' म्हणतात.

**चंदन, वाळा सरबत**

**घटक :** चंदन पूड १० ग्रॅम, वाळा पावडर १० ग्रॅम, पाणी १०० मिली. साखर २०० ग्रॅम.

**कृती :** पाणी उकळल्यावर गॅस बंद करावा. उकळलेल्या पाण्यात चंदन व वाळा पावडर टाकून ते झाकून ठेवावं. दोन तासानं मिश्रण चांगलं ढवळून घ्यावं. नंतर ते गाळून घेऊन मोजावं. १ वाटीच्या मिश्रणास दोन वाटी साखर आणि एक वाटी पाणी घ्यावं. पाणी व साखर एकत्र उकळून घ्यावं. उकळी येऊन फेस शांत झाला आणि मिश्रण स्वच्छ दिसू लागलं की गॅस बंद करावा. त्यात चंदन वाळ्याचं तयार केलेलं मिश्रण टाकून ते चांगलं ढवळावं. सरबताचं हे सिरप गाळून कोरड्या बरणीत भरून ठेवावं.



**उपयोग**

दाहशामक, डोळ्यांची आग, लघवीची आग कमी करतं. सतत तहान लागणं, ज्वर यासारख्या उन्हाळ्यातील तक्रारीत उपयुक्त.

# आईला गर्भाशयाचा कर्करोग असल्यास जन्माला येणाऱ्या मुलाला डोळ्याचा कर्करोग होण्याची शक्यता

**कुटुंबातील** एखाद्या सदस्याला डोळ्याचा कर्करोग असल्यास पुढील पिढीतील लहान मुलालादेखील हा आजार होण्याची दाट शक्यता असते. अनुवंशिक आजार होण्याचे प्रमाण ३० टक्के आहे. मात्र, ७० टक्के मुलांना कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना हा आजार झाल्याचे निदर्शनास आले आहे. आईला गर्भाशयाचा कर्करोग असल्यास जन्माला येणाऱ्या मुलाला डोळ्याचा कर्करोग होण्याची दाट शक्यता असते. आईच्या गर्भाशयाच्या कर्करोगाला कारणीभूत 'ह्युमन पॅपिलोमा' हा व्हायरस या मुलाच्या जन्माच्या वेळी त्यांच्या डोळ्यांना बाधा निर्माण करतो. त्यामुळे मुलांना डोळ्याचा कर्करोग होतो.

डोळ्यांच्या कर्करोगाचे (रेटिनोब्लास्टोमा) प्रमाण लहान मुलांत सर्वाधिक असून भारतात दरवर्षी या आजाराचे दोन ते अडीच हजार रुग्ण आढळतात. साधारणतः सहा वर्षांच्या आतील मुलांना हा आजार होत असला तरी या आजाराची लागण झालेल्या मुलांवर तत्काळ उपचार केल्यास त्यातून त्यांची मुक्तता करता येते. मात्र ६० टक्के मुलांच्या आजाराचे निदान वेळेत होत नसल्याने त्यांच्यावर उपचार करणे कठीण होते. डोळ्यांच्या ट्यूमरने ग्रस्त रुग्णांच्या संख्येत दोन ते तीन पटीने वाढ झाली आहे. विकसित देशांत रेटिनोब्लास्टोमा होऊनही त्यातून बचावणाऱ्या मुलांचे प्रमाण ९५ टक्के आहे.



**आजाराचा धोका**

डोळ्यांचा कर्करोग लहान मुलांत आढळतो. या आजाराच्या एकूण प्रकरणांपैकी दोनतृतीयांश प्रकरणे वय वर्षे दोनहून कमी वय असलेल्या मुलांत दिसून आली आहेत. तर ९५ टक्के प्रकरणे वय वर्ष पाचहून कमी वय असलेल्या मुलांबाबत आहेत.

**लक्षणे**

- ▮डोळे तिरळे होणे किंवा डोळे सारखे हलणे
- ▮एकाच किंवा दोन्ही डोळ्यांतील दृष्टी मंदावणे
- ▮दोन्ही डोळ्यांत वेगवेगळ्या रंगांची बुब्बुळ असणे
- ▮डोळ्यातल्या बाहुल्या आकाराने मोठ्या भासणे किंवा लाल होणे आणि त्यासह डोळ्यांत तीव्र वेदना होणे

## निदान कसे करावे

डोळ्यांचा कर्करोग झाल्यास नेत्रचिकित्साकडून डोळ्यांची तपासणी आणि इमेजिंग टेस्ट करून घ्याव्यात. त्यातून रेटिनोब्लास्टोमा आहे किंवा नाही, याचे निदान होऊ शकते. याशिवाय बायोमायक्रोस्कोपी, डोळ्यांची अँजिओग्राफी, सी.टी. स्कॅन, एमआरआय, पेटस्कॅन, बायॉप्सी या तपासण्यांच्या सहाय्याने डोळ्याच्या कर्करोगाचे निदान निश्चित होते. डोळ्यांच्या कर्करोगावर रेडिएशन, केमोथेरपी आणि लेझरथेरपी यांच्या सहाय्याने उपचार केले जातात.

या उपचारपद्धती आवश्यक असल्या तरी डोळा शस्त्रक्रिया करून काढून टाकावा लागतो. तसेच रेडिएशनमुळे मोतिबिंदू किंवा डोळा पूर्णतः कोरडा होणे, हे दुष्परिणाम दिसून येतात. डोळ्यांचा कर्करोग झालेल्या १० मुलांपैकी ९ मुलांचा रेटिनोब्लास्टोमा पूर्णपणे बरा करता येतो. ट्यूमर डोळ्यांच्या बाहेर पसरला नसेल तर रेटिनोब्लास्टोमा झालेले रुग्ण बरे होऊन भविष्यात निरोगी आयुष्य जगू शकतात.

# सई ताम्हणकरने गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर खरेदी केली आलिशान गाडी! लेकीचा आनंद पाहून आई भारावली

गेल्या काही दिवसांत मराठीसह बॉलीवूड कलाविश्वात अभिनेत्री सई ताम्हणकरने दबदबा निर्माण केला आहे. स्वप्न पाहिली आणि त्यासाठी अपार मेहनत केली की, आपली स्वप्न सत्यात उतरतात असंच काहीसं सईबरोबर झालं आहे. २०२४ हे वर्ष तिच्यासाठी सर्वार्थाने खास ठरत आहे. सातत्याने वैविध्यपूर्ण भूमिका साकारून सईची आणखी एक स्वप्नपूर्ती झाली आहे.गुढीपाडव्याच्या शुभदिवशी सईने आलिशान गाडी खरेदी केली आहे. अभिनेत्रीने मर्सिडीज बेंझ ही नवीकोरी गाडी गुढीपाडव्याच्या शुभदिनी आपल्या घरी आणली आहे. यावेळी अभिनेत्रीचे काही कुटुंबीय आणि आई उपस्थित होती. लेकीचा आनंद पाहून तिची आई देखील भारावून गेल्याचं या व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे.

सई ताम्हणकरने सुरुवातीच्या काळात प्रचंड संघर्ष करून इंडस्ट्रीत आपलं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. काही दिवसांपूर्वीच मुंबईत तिने आलिशान घर घेत चाहत्यांना आनंदाची बातमी दिली होती. आता अभिनेत्रीच्या घरी ही आलिशान गाडी आल्याने सध्या नेटकऱ्यांसह कलाकार मंडळी सईवर कौतुकाचा वर्षाव करत आहेत. तुम्ही काय करू शकता किंवा काय करू शकत नाही हे कोणालाही सांगू नका. स्वप्न पाहा, ते साध्य करा अन् ते स्वप्न जगा! असं कॅप्शन देत सईने हा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे.

दरम्यान, श्रीदेवी प्रसन्न आणि भक्षक नंतर आता येत्या काळात सई डब्बा कार्टल , अग्नी , ग्राउंड झिरो अशा वैविध्यपूर्ण प्रोजेक्टमध्ये महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहे. सध्या नेटकरी तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत आहे.






**दै. लोकरक्षणाय सुडोकू - ५३**


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 5 | | 4 | | | | | 3 |
| 9 | | | 7 | 3 | | | | 2 |
| 2 | 7 | | 8 | | | | | 6 |
| | | 6 | | 1 | | 5 | | 4 |
| 1 | 9 | | | | | | | |
| | 4 | | | 5 | 6 | 8 | 3 | |
| 4 | | | 1 | 8 | 3 | 7 | | |
| | | | | | | 2 | | 9 |
| 6 | 1 | | | 2 | | | | |

**उत्तर सुडोकू -५२**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 1 | 4 | 8 | 2 | 6 | 5 | 3 | 9 |
| 8 | 2 | 3 | 9 | 5 | 1 | 6 | 7 | 4 |
| 9 | 5 | 6 | 3 | 4 | 7 | 2 | 8 | 1 |
| 1 | 8 | 5 | 2 | 6 | 4 | 7 | 9 | 3 |
| 2 | 3 | 9 | 1 | 7 | 8 | 4 | 5 | 6 |
| 4 | 6 | 7 | 5 | 9 | 3 | 8 | 1 | 2 |
| 3 | 7 | 8 | 4 | 1 | 2 | 9 | 6 | 5 |
| 5 | 4 | 1 | 6 | 8 | 9 | 3 | 2 | 7 |
| 6 | 9 | 2 | 7 | 3 | 5 | 1 | 4 | 8 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# शिवानी सोनारने या अभिनेत्यासोबत उरकला साखरपुडा



रंग माझा वेगळा मधील आदित्य म्हणजेच अभिनेता अंबर गणपुलेने अभिनेत्री शिवानी सोनारसह गुपचूप साखरपुडा उरकला. या साखरपुड्याचे फोटो, व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. राजा राणी ची गंजोडी या मालिकेतून घराघरात पोहचलेली अभिनेत्री म्हणजे शिवानी सोनार. शिवानीनं अभिनेता अंबर गणपुळेबरोबर साखरपुडा केला आहे. अंबर झी मराठीवरील लोकमान्य या मालिकेत दिसला होता. अंबर याआधी रंग माझा वेगळा या मालिकेत काम करत होता. या मालिकेत त्यानं दीपाच्या दिराची आदित्यची भुमिका साकारली होती.

## दिनविशेष

**११ एप्रिल**

- १९१९: इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनची स्थापना झाली.
- १९७०: अपोलो-१३ यानाचे प्रक्षेपण झाले.
- १९७९: युगांडाचे हुकूमशहा इदी अमीन सत्ता सोडून पळून गेले.
- १९७६: ॲपल कंपनी चॲपल १ हे कॉम्पुटर तयार झाले.
- १९८६: हॅलेचा धूमकेतू पृथ्वीच्या सर्वात जवळ येत साडेसहा कोटी किलोमीटर अंतरावरून गेला.
- १९९२: चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, लेखक भालजी पेंढारकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला.
- १९९९: अग्नी-२ या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी झाली.
- १७५५: कंपवाताचा मानवी मेंदूशी संबंध आहे हे सिद्ध करणारे शास्त्रज्ञ जेम्स पार्किन्सन यांचा जन्म. (मृत्यू: २१ डिसेंबर १८२४)
- १७७०: ब्रिटनचे पंतप्रधान जॉर्ज कॅनिंग यांचा जन्म. (मृत्यू: ८ ऑगस्ट १८२७)
- १८२७: : श्रेष्ठ समाजसुधारक तसेच श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची दास्याची मीमांसा करणारे क्रांतिकारक विचारवंत जोतिराव गोविंदराव फुले ऊर्फ महात्मा फुले यांचा जन्म. (मृत्यू: २८ नोव्हेंबर १८९०)
- १८६९: कस्तुरबा गांधी यांचा जन्म. (मृत्यू: २२ फेब्रुवारी १९४४)
- १८८७: चित्रकार जेमिनी रॉय यांचा जन्म. (मृत्यू: २४ एप्रिल १९७२)
- १९०४: गायक आणि अभिनेते कुंदनलाल सैगल यांचा जन्म. (मृत्यू: १८ जानेवारी १९४७)
- १९०६: संस्कृत, प्राकृत, कोकणी या भाषांचे अभ्यासक डॉ. सुमित्र मंगेश कत्रे यांचा जन्म.
- १९०८: सोनी कंपनीच्या सह्संस्थापक मसारूइबुका यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९९७)
- १९३७: लॉनटेनिस खेळाडू रामनाथन कृष्णन यांचा जन्म.
- १९५१: अभिनेत्री रोहिणी हटंगडी यांचा जन्म.
- १९२६: अमेरिकन वनस्पतिशास्त्रज्ञ आणि कृषितज्ज्ञ ल्यूथर बरबँक यांचे निधन. (जन्म: ७ मार्च १८४९)
- १९७७: भारतीय लेखक आणि कार्यकर्ते फन्नीश्वर नाथ रेणू यांचे निधन. (जन्म: ४ मार्च १९२१)
- २०००: कर्करोग संशोधन क्षेत्रातील अग्रणी शास्त्रज्ञ, पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित कमल समर्थ ऊर्फ कमल रणदिवे यांचे निधन. (जन्म: ८ नोव्हेंबर १९१७)
- २००३: टेक्सास इन्स्ट्रूमेंट चे स्थापक सीसिल हॉवर्ड ग्रीन यांचे निधन. (जन्म: ६ ऑगस्ट १९००)
- २००९: भारतीय लेखक व नाटककार विष्णु प्रभाकर यांचे निधन. (जन्म: २१ जून १९१२)
- २०१५: भारतीय लष्करचे जनरल लेफ्टनंट हनुतसिंग राठोड यांचे निधन.(जन्म: ६ जुलै १९३३)

## भविष्य

**मेष** असुरक्षितता अथवा आत्मविस्मृतीच्या भावनेमुळे चक्कर येईल. तुमच्या नियमित कष्टांचे आज चांगल चीज होईल.

**वृषभ** विश्रांती घ्या आणि कामात व्यग्र असताना मधेमधे थोडा आराम करा. वाईट सवयी तुम्हाला जडविण्यासाठी कारणीभूत ठरणाऱ्या व्यक्तींपासून दूर राहा.

**मिथुन** चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. तुमच्या पालकांसोबत तुमचा आनंद वाटा.

**कर्क** तुमचे विनयशील वागण्याबद्दल कौतुक होईल. अनेक लोक तुमच्यावर स्तुतिसुमने उधळतील. मित्रांच्या मदतीमुळे आर्थिक अडचण सुकर होईल.

**सिंह** तुमच्या विचारांवर ज्यांचा असाधारण प्रभाव आहे अशा विशेष व्यक्तीची ओळख मित्रामुळे होऊ शकते. किरकोळ आणि ठोक व्यापाऱ्यांसाठी चांगला दिवस.

**कन्या** अलिकडे घडलेल्या घटनांमुळे तुमचे चित्त विचलित होईल. ध्यानधारणा आणि योगासने यामुळे तुम्हाला शारीरिक व अध्यात्मिक फायदा होईल. आज कार्य क्षेत्रात तुमच्या कुणी जुन्या कामाचे कौतुक होऊ शकते.

**तुला** भावनिकदृष्ट्या तुम्ही स्थिर व्यक्ती नाही आहात, त्यामुळे इतरांसमोर कसे वागता बोलता त्याबाबत सावध असणे योग्य ठरेल. स्थावर जंगम मालमत्ता गुंतवणूक लाभदायी ठरेल.

**वृश्चिक** विनाकारण स्वतःची निंदा करून तुमचा उत्साह घालवू नका. दिवसाच्या उत्तरार्धात आराम करा. कामातील दबावामुळे मानसिक खळबळ आणि अशांती वाढेल.

**धनु** आजच्या दिवशी तब्येत एकदम उत्तम असेल. तुम्हाला जिथे बोलण्याची गरज नाही तिथे तुम्ही बोलू नका. जबरदस्ती बोलण्याच्या कारणाने तुम्ही स्वतःला चिंतेत टाकू शकतात.

**मकर** तुमच्या वडिलांचा सल्ला आज तुम्हाला कामाच्या क्षेत्रात धन लाभ करवून देऊ शकतो. तुमचे हसतमुख वागणे कुटुंब जीवन प्रकाशमान करतील. शक्य असेल तर लांबचा प्रवास टाळणे चांगले.

**कुंभ** तुमचे व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी कठोर प्रयत्न करा. तुम्हाला एकाकी वाटेल तेव्हा तुम्ही तुमच्या कुटूंबियांची मदत घ्या. त्यामुळे नैराश्यापासून तुमचा बचाव होईल. परिणामी सुयोग्य, संयुक्तिक निर्णय घेण्यास तुम्हाला मदत होईल.

**मीन** आजवर दबून राहिलेले सुप्त प्रश्न उभे राहिल्यामुळे मानसिक तणाव येऊ शकतो. आज तुम्ही सहजपणे भांडवल उभे कराल - राहिलेली देणी परत मिळवाल - किंवा नवीन प्रकल्पांसाठी निधी मागाल. कुटुंबाच्या कल्याणासाठी मेहनत करा.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# भारतीय निवडणुकीचे जागतिक क्षितिज

भारतीय नागरिकांना मतदान हे मूलभूत कर्तव्य आहे याची जाणीव हवीच; परंतु बदलत्या परिस्थितीत ती जागतिक जबाबदारीही आहे, याचे भान असणे गरजेचे आहे. भारतीय लोकशाही जागतिक संकटांवर उपाय शोधण्यास सक्षम आहे, अशी भावना जगभरातील लोकशाहीवादी समुदायाची आहे, याचीही जाणीव ठेवायला हवी. जागतिक लोकशाहीच्या दृष्टीने २०२४ हे महत्त्वाचे वर्ष. भारत आणि अमेरिका या जगातील मोठ्या लोकशाही देशांत निवडणुकीचे बिगुल वाजले आहेत. रशिया-युक्रेन युद्ध, इस्त्राईल-पॅलेस्टाईन संघर्ष, जागतिकीकरणाच्या विरोधात वाढणारा असंतोष, नैसर्गिक साधन-संपत्तीसाठीचा जीवघेणा संघर्ष, निर्वासित आणि स्थलांतरितांचे प्रश्न, राजकीय समस्यांचे आर्थिक समस्यांमध्ये होणारे रुपांतर आणि आर्थिक समस्यांना मिळणारे राजकीय अस्थिरतेचे रूप यामुळे जागतिक राजकारण अनिश्चित,असुरक्षित बनले आहे. परिणामी, जगभरात लोकशाही, मानवी मूल्ये आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यासमोर इतिहासातील सर्वात मोठे संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर भारत आणि अमेरिका या दोन्ही देशातील निवडणुका महत्त्वाच्या आहेत. परंतु अमेरिकी जनमानसाचा कौल पाहता अमेरिकेत पुन्हा (डोनाल्ड) ट्रम्पवाद बोकाळण्याची शक्यता असून, या प्रश्नांवर अमेरिकी जनतेकडून कोणत्याही ठोस भूमिकेची अपेक्षा व्यर्थ आहे. परिणामी, भारतात होऊ घातलेल्या निवडणुकीची व्याप्ती ही देशांतर्गत विषयापुरती मर्यादित न राहता तिची व्याप्ती जागतिक आहे. भारतीय लोकशाही जागतिक राजकारणावर घोंगावत असणाऱ्या संकटावर उपाय शोधण्यास सक्षम आहे, अशी भावना जगभरातील लोकशाहीवादी समुदायाची आहे. म्हणूनच निवडणुकीला सामोरे जाताना भारतीय नागरिकांना मतदान हे मूलभूत कर्तव्य आहे याची जाणीव हवीच; परंतु बदलत्या परिस्थितीत ती जागतिक जबाबदारी आहे, याचे भान असणेही गरजेचे आहे. परंतु सद्यस्थितीत भारतीय जनमानस आणि भारतीय नेते यांना या जबाबदारीची जाणीव आहे, असे म्हणणे धाडसाचे ठरेल. साधारणतः भारतीय निवडणुकीतील प्रचार हा व्यक्ती, जात, धर्म आणि पक्ष यांच्याभोवतीच केंद्रित असतो. लोकसभेची निवडणूक म्हणजे विधानसभेचीच निवडणूक असल्याचा समज करून प्रचाराचा रोख हा संपूर्णतः स्थानिक मुद्यांवरच असतो.परिणामी जागतिक राजकारण आणि परराष्ट्र धोरण यांसारख्या महत्त्वाच्या विषयावर आपल्या संसद सदस्याची काय भूमिका आहे, याचा आपल्याला थांगपत्ता देखील नसतो. तसेच जागतिक राजकारण आणि परराष्ट्र धोरण हे मूठभर नेते आणि नोकरशाही यांना आंदण दिल्यामुळे भारतीय संसदेचा सदस्य म्हणून आपण देखील जागतिक राजकारण आणि परराष्ट्र धोरणावर भूमिका घेऊ शकतो. किंबहुना घेतलीच पाहिजे, या जाणीवेचा पूर्ण अभाव संसद सदस्य होऊ इच्छिणाऱ्या बहुसंख्य उमेदवारांमध्ये दिसतो. निवडणूक हे युद्ध नसून ती वैचारिक आदान-प्रदान करण्यासाठीची राजकीय प्रक्रिया आहे, याचाच विसर आपल्याला पडतो. जागतिक राजकारणातील भारताचे स्थान हे कोणत्याही देशाशी असलेल्या संबंधावरून अथवा कोणत्याही एका व्यक्तीच्या यशावर अवलंबून नसते. एक देश म्हणून जागतिक प्रश्नांवर आपल्याकडे उत्तर आहे की नाही, यावर त्या देशाचे जागतिक राजकारणातील महत्त्व अधोरेखित होते. हे महत्त्व जागतिक समुदायावर बिंबवण्यासाठी निवडणुकीसारखा दुसरा मोठा मंच नसतो.

रशिया-युक्रेन प्रश्नांवर महाराष्ट्राची भूमिका काय आहे? मुंबईसारख्या जागतिक वित्तीय केंद्रावर या युद्धाचे काय परिणाम होतील? अमेरिकन व्हिसा धोरणाचा पुणे शहरावर काय परिणाम होईल? जगाला हेवा वाटेल, असे आदर्श शहर आपण बनवू शकू का? जागतिक आरोग्य व्यवस्थेला आदर्शवत यंत्रणा आपण निर्माण करू शकू का? सामान्य मतदारावर थेट परिणाम करणाऱ्या या जागतिक प्रश्नावर माझा प्रतिनिधी काय विचार करतो? जागतिक प्रश्नाकडे बघण्यासाठी जी वैचारिक बैठक लागते ती माझ्या लोकप्रतिनिधीकडे आहे का? असे प्रश्न मतदार म्हणून विचारावे लागतील. असे प्रश्न विचारणाऱ्या नागरी समाजाची निर्मितीच आपल्या संकुचित राजकीय संस्कृतीमुळे होऊ शकलेली नाही. म्हणूनच लोकप्रतिनिधी आणि मतदार यांच्यात जे वैचारिक मंथन होणे गरजेचे असते, ते होत नाही. परिणामी, निवडणुका वैचारिक देवाणघेवाणीपेक्षा आरोप-प्रत्यारोपांमुळे जास्त गाजतात. आपण रुजवलेल्या या राजकीय संस्कृतीचे परिणाम बघायचे असतील तर महाराष्ट्रासारखे दुसरे उदाहरण नाही. एकेकाळी हिमालयाच्या मदतीला सह्याद्री गेला, असे अभिमानाने मिरवणाऱ्या महाराष्ट्राची अवस्था बिकट आहे. उदाहरणार्थ यशवंतराव चव्हाण यांचा अपवाद वगळता महाराष्ट्रातील एकाही संसद सदस्याने परराष्ट्र मंत्रालयाची धुरा सांभाळलेली नाही. शरद पवारांनंतर संरक्षण मंत्रालयाची धुरा देखील महाराष्ट्रातील नेत्याकडे आलेली नाही.

# कराग्रे वसते लक्ष्मी..



वस्तू आणि सेवा कर व्यवस्थेचे (जीएसटी) मूळ आरेखनकार डॉ. विजय केळकर यांनी अखेर सात वर्षांनंतर जाहीर मतप्रदर्शन केले. अखेर डॉ. विजय केळकर बोलले. वस्तू आणि सेवा कर व्यवस्थेचे मूळ आरेखनकार असलेले डॉ. केळकर यांनी ही नवीन कररचना प्रणाली अस्तित्वात आली तेव्हापासून (२०१७) जीएसटी विषयी चकार शब्द कधी काढला नव्हता. सुरुवातीच्या काळात या कररचनेची चांगलेच फे फे उडाली. या कररचनेत वारंवार बदल केले गेले. एखादा घटक कधी जीएसटीच्या आत, कधी बाहेर असे अनेकदा झाले. गुजरात विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर खाखरा हा खाद्यपदार्थ समस्त भारतीयांसाठी जणू जीवनावश्यक आहे असे समजून त्यावरील करात कपात केली गेली आणि पंजाब निवडणुकांचा विचार करून गुरुद्वारांतील लंगरसाठी केली जाणारी धान्यखरेदी या करातून वगळली गेली. तरीही डॉ. केळकर यांनी या कराविषयी जाहीर प्रतिक्रिया देणे नेहमीच टाळले. जीएसटी हा अप्रत्यक्ष कर. तो थेट/प्रत्यक्ष कराप्रमाणे उत्पन्नाशी निगडित नसतो. गरीब, श्रीमंत असा भेदभाव न करता सगळयांवरच अप्रत्यक्षपणे तो आकारला जातो. अशा या अप्रत्यक्ष करात महत्त्वाच्या सुधारणांची गरज डॉ. केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने २००० साली सुचवली होती. त्यानंतर १७ वर्षांनी तो प्रत्यक्षात आला. त्यासाठी १४ ऑगस्ट १९४७ ची आठवण करून देईल असा मोठा सोहळा संसदेत मध्यरात्री आयोजित केला गेला. हे सध्याच्या इव्हेंटीकरण संस्कृतीस तसे साजेसेच. पण लेकराच्या परीक्षेचा निकाल काय लागला याची फिकीर न बाळगता त्याच्या तीर्थरूपांनी कितीही झगझगीत सोहळा केला म्हणून चिरंजीवांच्या गुणपत्रिकेतले लाल शेरे काही कमी होत नाहीत. जीएसटीचे तसे झाले. शेवटी या योजनेचे मूळ वर्गशिक्षक डॉ. केळकर यांनाही आपले मौन सोडावे लागले. राजधानीतील भाषणात त्यांनी या योजनेच्या विद्यमान वास्तवावर भाष्य केले आणि काही सुधारणा सुचवल्या. डॉ. केळकर तीन प्रमुख सूचना करतात. आताच्या पाच-सहा दर वैविध्यांच्या तुलनेत एकच एक सरसकट १२ टक्के इतकीच कर आकारणी केली जावी, ही पहिली. सध्या जीएसटीचे नियंत्रण बहुतांशी केंद्राकडून होते. यामुळे केंद्र आणि राज्य यांच्यात विसंवाद निर्माण होतो आणि केंद्रातील सत्ताधारी पक्षाची सत्ता ज्या राज्यांत आहे आणि नाही त्यांच्यात एक घर्षण होत राहते. त्यामुळे केंद्रनियंत्रित जीएसटी परिषद ही केंद्रापासून अ-संलग्न करून तीस अधिक स्वातंत्र्य दिले जावे. ही दुसरी. आणि असे झाल्यानंतर या करांतून येणाऱ्या महसुलात स्थानिक स्वराज्य संस्थांनाही वाटा दिला जावा, ही त्यांची तिसरी सूचना. हे तीनही मुद्दे अत्यंत स्वागतार्ह आणि तसेच नितांत गरजेचे आहेत. त्यामुळे या करातील अनावश्यक गुंतागुंत दूर होईल. सध्याच्या राजकीय उन्मादी वातावरणात हा असा विषय दुर्लक्षित राहण्याचीच शक्यता अधिक. त्यात विद्यमान व्यवस्थेस तज्ज्ञांचे कमालीचे वावडे. या वास्तवाकडे दुर्लक्ष करून डॉ. केळकर यांनी केलेल्या तीन अत्यंत महत्त्वाच्या सूचनांचे स्वागत आणि त्यावर मतप्रदर्शन आवश्यक ठरते. सद्यःस्थितीत आपल्याकडे शून्य, पाच, १२, १८, २८ टक्के वर अधिक दहा टक्के अधिभार अशा अनेक टप्प्यांत जीएसटी कर आकारला जातो. तसेच पेट्रोल, डिझेल आणि मद्य या घटकांचा अंतर्भाव जीएसटीत नाही. हे दोन्हीही मुद्दे जीएसटीच्या मूळ तत्त्वालाच हरताळ फासणारे आहेत आणि पहिल्या दिवसापासून या अशा दिव्यांग कराची अंमलबजावणी सुरू आहे. एक देश एक कर हे आणि कोणत्याही घटकास या कर परिघाबाहेर ठेवायचे नाही, हे जीएसटीचे मूलभूत तत्त्व. तथापि सद्यःस्थितीत अनेक पातळयांवर कर आकारला जात असल्याने अनेक वस्तू निमार्ते वा सेवादार यांचा प्रयत्न असतो तो आपणास कमीत कमी कर कसा लागू होईल, याचा. त्यातून लबाडया होतात. त्यात आपल्याकडचे सुरुवातीचे काही हास्यास्पद भेदभाव. नाममुद्राधारी बंद पिशव्यांतून तांदूळ विकला तर कराचा एक दर आणि तोच उघडया पोत्यांतून विकल्यास त्यास दुसरा दर! अशा बिनडोक वर्गीकरणांमुळे या कररचनेतील व्यंग अधिकच वाढले. शिवाय इंधन आणि मद्य यांस करजाळ्यात न आणल्याने कोणत्याही वस्तू/सेवा यांच्या दरनिश्चितीत महत्त्वाचा असलेला इंधन हा घटक कराबाहेरच राहिला. यामुळे विसंगती आणखीच वाढली. हे सर्व निर्णय घेतले जातात जीएसटी परिषदेत. तीत सर्व राज्यांच्या अर्थमंत्र्यांचा सहभाग असतो. वरवर पाहता केंद्र सरकार ही परिषद तिचे निर्णय घेण्यास समर्थ आहे आणि त्या निर्णयाशी सरकारचा काही संबंध नाही, असे म्हणू शकते. हा लबाड युक्तिवाद भक्तगणांस रिझवण्यासाठी छान. पण तो शास्त्रकाटयाच्या कसोटीवर टिकणारा नाही. या परिषदेत नकाराधिकाराचा अधिकार (व्हेटो) फक्त केंद्रास आहे आणि कोणताही प्रस्ताव राज्यांस मांडावयाचा असेल तर त्यास किमान १० ते १२ राज्यांचे समर्थन असावे लागते. ते समजा मिळाले आणि एखाद्या बदलाच्या बाजूने राज्यांचा कल असला; पण केंद्रास हा बदल मंजूर नसेल तर बदलाच्या बाजूच्या मतांचे प्रमाण एकूण मतांच्या तीनचतुर्थांश इतके होऊच शकत नाही. म्हणजे केंद्रास जे नामंजूर ते प्रत्यक्षात येणे अशक्य. त्यातूनच केंद्र आणि राज्य यांत खटके उडू लागले असून तमिळनाडू, पश्चिम बंगाल यांसारख्या भाजपेतर राज्यांनी वेगळी चूल मांडण्याची भाषा सुरू केली आहे. तूर्त तरी आपला देश हे संघराज्य आहे. म्हणजे केंद्र आणि राज्ये या दोन्हींस कर अधिकार आहेत. पण जीएसटी परिषद सरळ सरळ राज्यांच्या अधिकारांचा संकोच करते. अनेक राज्यांत केंद्रातील सत्ताधारी भाजपचीच सरकारे असल्याने या रचनेस उघड विरोध केला जात नाही. तरीही येडियुरप्पा हे भाजपचेच नेते कर्नाटकाचे मुख्यमंत्री असताना त्यांच्या सरकारनेही याविरोधात सूर लावला होता. त्यामुळे डॉ. केळकर यांची दुसरी सूचनाही तितकीच महत्त्वाची. तिसरा मुद्दा आहे तो दिवसेंदिवस कफल्लक होत चाललेल्या आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा. एखादी मुंबई वगळता आपल्या अन्य अनेक शहरांस उत्पन्नाचे काही साधनच नाही. कसाबसा हाती लागणारा मालमत्ता कर हा कर्मचाऱ्यांच्या वेतनासही पुरत नाही. बरे राज्य सरकारांकडे काही मागावे तर तीही दरिद्रीच. कारण सगळे कर अधिकार वस्तू/सेवा कर घेऊन गेलेला. राज्यांहाती पूर्वी विक्री कर , अबकारी असे काही अधिकार असत. आता ते नाहीत. जीएसटीने हे सर्व कर काढून घेतले. त्यामुळे राज्यांनाच आता केंद्राकडून मिळणाऱ्या जीएसटीतील वाटयाकडे डोळे लावून बसावे लागते. राज्यांच्या आडातच नसेल तर मग त्याखालच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पोहऱ्यात काय येणार? तेव्हा पहिली सूचना अमलात आली तर केंद्राच्या तिजोरीत कराचा ओघ वाढेल, दुसऱ्या सुधारणेमुळे राज्ये स्वखुशीने जीएसटीचा आवाका वाढवतील आणि असे झाल्यास तिसरी सूचना प्रत्यक्षात आणता येईल आणि दरिद्री होत चाललेल्या आपल्या शहरांच्या हातांवर काही टेकवता येईल.नवीन सरकारने जीएसटी रचनेत हे महत्त्वाचे बदल करावेत , असा डॉ. केळकर यांचा सल्ला आहे. आपला आशावाद प्रत्यक्षात येईल, असेही त्यांस वाटत असावे. खरे तर गेल्या सात वर्षांत डॉ केळकर यांनी सर्वोच्च सत्ताकेंद्रापुढेही अनेकदा हे सुधारणा प्रस्ताव दिले असणार. तेव्हा त्यांचे काही झाले नाही. पण पुढच्या सरकार ने तरी ते करावे. सहज, सोप्या कररचनेत लक्ष्मी असते. कररचना जितकी सुलभ-सोपी, तितके लक्ष्मीचे दान अधिक. या सत्यासाठी तरी करसुधारणा व्हाव्यात, ही आशा.

# २५ वर्षांनंतरही गटारे अजूनही आहेत उघडी

## नगर परिषदेच्या दुर्लक्षाने नागरिकांमधून संताप

**पालघर** : पालघर नगर परिषद एकीकडे सुशोभीकरणासाठी व रस्त्यांसाठी कोट्यवधी रुपये खर्च करत आहे. मात्र शहरातील गटारे आजही उघडी आहेत. त्यावर झाकण लावण्याची आवश्यकता असताना त्याकडे नगरपरिषद दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

पालघर शहरातील प्रत्येक प्रभागात ठिकठिकाणी गटार बनवण्यात आली आहेत. त्या गटारांवर झाकण लावून ती बंद करणे अपेक्षित असताना नगरपरिषद त्याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे. यामुळे आजार बळावण्याची शक्यता आहे. शहरात सर्व ठिकाणी उघडी गटार आहेत. आनंदाश्रम इंग्लिश हायस्कूलच्या भिंतीलगत मोठे गटार आहे. तेही उघडे आहे. तिथे मोठ्या प्रमाणात विद्यार्थी शिक्षण घेतात. कधी एखादा विद्यार्थी त्यात पडल्यास अनर्थ घडू शकतो. तरीही नगरपरिषद या गोष्टीकडे लक्ष देत नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. पालघर नगरपरिषद २५ वर्षे पूर्ण करत आहे. तरी आजही गटारांची स्थिती जैसे थेच आहे. गटार उघडी असल्याने रोगराईस आमंत्रण मिळत आहे. आजार बळावत आहेत. नगरपरिषद नक्की करते काय, असाही प्रश्न नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे.



> “ बहुतेक सर्व ठिकाणी गटारी उघडी आहेत. हे काम प्राधान्यक्रमाने सोडवणे गरजेचे असताना नगरपरिषद नाही त्याठिकाणी करोडो रुपयांची उधळपट्टी करत आहे. नगराध्यक्ष व प्रशासन नक्की करतात काय.
>
> – **सतीश दहिवले**, अध्यक्ष पालघर नागरी कृती समिती

> “ बहुतांश ठिकाणची गटारी उघडी असल्याने त्यात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्या पाण्याच्या बाटल्या, नारळाच्या झावळ्या, माती पडलेली आहे. ती साफ करणे आवश्यक असताना नगरपरिषद स्वच्छतेच्या दृष्टीने काहीच करत नाही. फक्त रस्त्याची टेंडर काढून विकास होत नसतो. गटार साफसफाईसाठी करोडो रुपये खर्च केलेले दाखवले जातात. मग ते नक्की कुठे जातात.
>
> – **मनोज दांडेकर**, सामाजिक कार्यकर्ते

# महिलेला लुटणाऱ्या तोतया पोलिसास अटक

**पनवेल** : पोलीस असल्याची बतावणी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला पनवेल तालुका पोलिसांनी अटक केली. पनवेल तालुक्यातील वावंजे येथील सुमित्रा सोनगार (६०) यांना एका व्यक्तीने पोलीस असल्याची बतावणी करून जवळच एका घरात चोरी झाली असून गुन्ह्यातला मुद्देमाल तपासायचा आहे, असे सांगितले होते. तुमचे सोने दाखवा, असे सांगून त्यांचे सोने पळवले. या घटनेवरून पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास करत असताना पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या तपास पथकातील अंमलदारांनी जवळजवळ ८० ते ८५ सीसीटीव्ही फुटेज तपासले. दरम्यान, वावंजे गाव ते बदलापूर रस्त्यालगत सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून जेल रिलीजमधील आरोपींची माहिती घेतली. त्यानुसार तांत्रिक विश्लेषण करून गुन्ह्यामध्ये विशाल सगलगीले (४०) याला गंगा कॉलनी, भाल गाव, कटई रोड-पाइपलाइन बदलापूर रोड येथून ताब्यात घेण्यात आले. आरोपीकडे चौकशी केली असता त्याने हा गुन्हा केल्याचे कबूल केले. आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी, पोलीस गणवेश जप्त करण्यात आला आहे. आरोपीवर यापूर्वी खारघर पोलीस स्टेशन, तळोजा पोलीस स्टेशन एनआरआय पोलीस ठाणे येथे देखील गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले. या गुन्ह्याचा अधिक तपास पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हर्षल राजपूत करत आहेत.

# मोटारसायकल, रोख रकमेची चोरी

**नवीन पनवेल** : चायनीज हॉटेलच्या गल्ल्यामधून रोख रक्कम व मोटारसायकल चोरून नेल्याप्रकरणी सैफ शेख या कुकविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. किरण गुंजाळ यांचा पनवेल रेल्वे स्टेशनजवळ एचडीएफसी बँकेच्या एटीएमच्या बाजूला चायनिजचे दुकान आहे. या चायनीजवर त्यांनी सैफ शेख हा कुक कामासाठी ठेवला होता. गुंजाळ यांनी पैसे दुकानाच्या ड्रॉवरमध्ये ठेवले होते. ते पैसे न सापडल्याने त्यांनी कुक सैफ शेखला संपर्क साधला, मात्र झाला नाही. तसेच तो हॉटेललाही परत आला नाही. त्यामुळे गुंजाळ यांनी त्याच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# Pregnant teen refused medical care permitted to take treatment in Mumbai's JJ Hospital: Bombay HC

**Mumbai**

The Bombay High Court on Wednesday permitted a 17-year-old pregnant girl, refused medical assistance by some hospitals, to seek treatment at the state-run JJ Hospital in Mumbai. The girl, in her petition filed through her mother in the high court, said hospitals refused her treatment as she did not want to lodge a police complaint against a boy with whom she was in a relationship. The relationship between the girl and boy, who is also aged 17, was consensual, the petition said. The plea said refusal of medical treatment was violative of the girl's fundamental rights enshrined in the Constitution of India.

Government pleader Purnima Kantharia submitted to a division bench of Justices G S Kulkarni and Firdosh Pooniwalla that the girl could seek treatment at the JJ Hospital.

The girl would, however, have to submit a



emergency police report stating that she does not wish to pursue a criminal complaint against the boy, Kantharia said.

The petitioner's advocate informed the court that the girl did not want to abort the child and once the baby is born, he or she would be put up for adoption.

The plea said a shelter home in suburban Andheri has agreed to admit her before and after her delivery for assistance and care.

The bench in its order said the girl shall submit her statement in the form of an emergency police report through her advocate by Friday.


"There is no harm in submitting a statement to the police," the HC said.

"The girl shall be entitled to seek medical treatment at the JJ Hospital. The dean of the hospital shall take all care to maintain confidentiality of the case and the treatment provided," the court said.

The shelter home identified by the petitioner shall permit the girl to be admitted for care and assistance, it said.

"All these shall be provided without any insistance of a police complaint. This is a fair order," the bench said and disposed of the petition.

# Ronaldo faces two-game ban after red card



**Abu Dhabi**

Cristiano Ronaldo is facing a two-game suspension after receiving his first red card in Saudi Arabia for elbowing an opponent as Al-Nassr lost 2-1 to Al-Hilal in the Saudi Super Cup semi-finals. The five-time Ballon D'Or winner, who signed for Al-Nassr in December 2022, was dismissed in the 86th minute for striking Al-Hilal defender Ali Al-Bulaihi.

According to media reports in Saudi Arabia, the 39-year-old football great may receive further punishment after seeming to mock the referee as he left the field in Abu Dhabi on Monday. "I'm not going to take credit away from Ronaldo," Al-Hilal coach Jorge Jesus said about his Portuguese compatriot.

"He's still very strong, he always has been and will continue to be the most important player in the world, he's an example and a model. But he's not used to losing in his career, so it is natural for him to lose his head when he loses, as well as for him to lose emotional and mental focus in defeats."

# 'Was sidelined, worked to become better version of myself': Suryakumar Yadav on his comeback



**Mumbai**


India and Mumbai Indians batter Suryakumar Yadav on Wednesday revealed that he battled three different injuries in the past three months but worked hard to become a 'better version' of himself while going through a 'boring' recovery process. The world No.1 T20 batter, who made his comeback last week in IPL 2024, revealed that apart from sports hernia for which he had to undergo a surgery and an ankle problem, he also endured an injury to his right knee. "I had two-three niggles together, sports hernia, ankle and then right knee. I had to take one step at a time, follow the small things and here I am, really happy to be on the ground," Yadav said in a video released by IPL. The 33-year-old said it was "boring" for him to follow the same routine during rehab work at the start but he decided to make the most of the opportunity. "It's actually a little difficult to describe the last three (or) three-and-a-half months. It was difficult, the first two-three weeks, because I felt (it was) very boring doing the same things again and again (in) the rehab," he said. "But (by) the fourth-fifth week, I realised that it is important going forward." A conversation with his wife was helpful in giving him perspective. "When I spoke to my wife and all the people at NCA, they said it has to be a second version of yourself, you have to be a little different when you come back on the field. I started doing all those small things like sleeping on time, following a good diet, that was most important," he added. Yadav said time away from the game helped him focus on aspects he had neglected and that helped him recover faster. "I (had) never read a book in my life and I started doing that as well. Getting up in the morning, spending a good quality time at the rehab centre and focusing on everything, connecting myself, my brain and my body with the rehab and it helped me really well to recover a little faster," he said.

# निवडणूक कामाला जुंपल्याने कार्यालये पडली ओस

## नागरिकांना कामासाठी मारावे लागतात हेलपाटे

■ **मीरा रोड** : गेल्या काही दिवसांपासून लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणुकीच्या कामासाठी प्रत्येक शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे जनतेला आवश्यक असलेले मीरा-भाईंदर अपर तहसीलदार कार्यालयदेखील ओस पडल्याचे चित्र दिसून येत आहे. कार्यालयात कोणताच अधिकारी व कर्मचारी उपस्थित नसल्याने कामासाठी आलेल्या नागरिकांना आपली कामे होत नसल्याने माघारी परतावे लागत आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांच्या दाखल्याची कामे होत नसल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

निवडणुकीचे काम सुरू झाल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून शासकीय कार्यालये आणि प्रामुख्याने मीरा-भाईंदर महापालिका स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यालये ओस



पडली आहेत. मीरा-भाईंदरमधील अपर तहसीलदार कार्यालयावर आचारसंहितेचा मोठा परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. या कार्यालयात अधिकारी, कर्मचारी निवडणूक कामाला जात असल्याचे सांगत कार्यालयात उपस्थित राहत नसल्याचे दिसून येते. सोमवारी तर तहसील कार्यालय ओस पडले होते. त्यामुळे महसूल विभागाला सुट्टी आहे की काय, असा प्रश्न निर्माण झाला होता.

आचारसंहितेमुळे कोणतीही नवीन कामे मंजूर होत नाहीत. परंतु नागरिकांना अत्यावश्यक असलेले उत्पन्नाचा दाखला, रहिवाशी, जातीचे दाखले व ज्येष्ठ नागरिक दाखला आणि क्रिमिलेअर प्रमाणपत्रे यांचीही कामे होताना दिसत नाहीत. यामुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश असताना आचारसंहितेच्या नावाखाली अतिसंवेदनशील सीआरझेड, पाणथळ, बफर झोन व मँग्रोज भागात कांदळवनात माती भराव व कत्तल सुरू असल्याच्या तक्रारी, तसेच शहरातील नवीन इमारतीचे सुरू असलेल्या काम व सिमेंट रस्ते व मेट्रो लाइन यांच्यातून निघणारा राडारोडा व डेब्रिज टाकून पर्यावरणाचा ऱ्हास सुरू आहे. त्याकडे महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी नसल्याने दुर्लक्ष होत आहे. यावर तातडीने जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालण्याची गरज आहे. सामान्य जनतेच्या कामांना प्राध्यान देऊन त्यासोबत निवडणुकीचे काम करावे.

> लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे मंडळ अधिकारी व तलाठी यांनाही निवडणुकीची कामे देण्यात आली आहेत. तसेच अधिकारी, कर्मचारी हे त्यांच्या सोयीनुसार नागरिकांची कामे तत्परतेने करत आहेत. विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांच्या कामाला प्राधान्य देऊन काही प्रमाणात कामे सुरू आहेत. निवडणुकीच्या कामासाठी वर्ग केलेल्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त कोणी गैरहजर राहत असेल तर त्यांचा बेशिस्तपणा खपवून घेतला जाणार नाही.
> **- निलेश गौंड, अपर तहसीलदार, मीरा-भाईंदर**

> अपर तहसीलदार यांच्याशी बोलून जनतेच्या अत्यावश्यक असलेल्या कामाकडे लक्ष देण्यास सांगितले जाईल. तसेच नागरिकांच्या अत्यावश्यक असलेल्या कामाबाबत जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यावर तोडगा काढण्यात येऊन निवडणुकीच्या कामाबरोबर नागरिकांच्या कामालादेखील प्राधान्य दिले जाणार आहे.
> **- सुदाम परदेशी**, निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे

# फसवणूक केलेली रक्कम तक्रारदाराला परत

## ऑनलाइन आमिष दाखवून घातला गंडा

■ **मीरा रोड** : भाईंदर पश्चिमेला राहणाऱ्या तरुणाला ऑनलाईन जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत अडीच लाखांची फसवणूक केली होती. उत्तन सागरी पोलिसांनी तपास करून तक्रारदाराला फसवणूक झालेली रक्कम परत मिळवून दिली आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील उत्तन सागरी पोलीस ठाणे हद्दीतील बिंडा बोनी ढोलु (२३) हा तरुण पार्टटाइम जॉबसाठी युट्युबवर व्हिडीओ सर्च करत होता. त्यावेळी त्याला मौरीन नावाच्या व्यक्तीने व्हॉट्सॲपव्दारे त्याच्या मोबाईल नंबरवर लिंक पाठवली. लिंक उघडून ऑनलाइन वस्तू खरेदी करून त्यांचे विक्रीचे टास्क पूर्ण केले तर जास्त नफा मिळेल, असे आमिष दाखवले. नंतर तरुणाला वेगवेगळ्या यूपीआय आयडीवर पैसे भरण्यास सांगितले. त्याने ऑनलाइन टास्क पूर्ण केले. भरलेले पैसे, त्याच्या बदल्यातील नफा असा परतावा न देता त्याची २,४९,१७० रुपयांची फसवणूक करण्यात आली. याबाबत उत्तन सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास करताना आरोपींनी फिर्यादी, पीडिताची रक्कम स्वीकारण्यासाठी, तसेच ती रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यात वळती करण्यासाठी वापर केलेले विविध बँक खाते निष्पन्न झाले होते. त्यामुळे तक्रारदाराचे पैसे परत मिळवण्यासाठी बँक खात्यामधील रक्कम गोठवण्यात आली होती. नंतर न्यायालयाकडून तक्रारदाराची रक्कम परत मिळवण्यासाठी उत्तन सागरी पोलीस ठाण्याचे अधिकारी, अंमलदारांनी पाठपुरावा केला.

# चोरीसाठी विमानाने मुंबईचा प्रवास, नागालँड आसाम मधील चोरट्याला अटक

■ **ठाणे** : व्यवसायिक किंवा नोकरदार शक्यतो कामानिमित्ताने विमानाने मुंबईमध्ये प्रवास करत असतात. परंतु आसाममध्ये राहणारा मोईनुल इस्लाम हा चोरटा चोरीच्या उद्देशाने थेट आसाममधून मुंबईत प्रवास करत असे. गेल्या दोन वर्षांपासून तो चोरी करून पुन्हा विमानाने आसाम किंवा नागालँडमध्ये परतत होता. पोलिसांपासून बचावासाठी तो मोबाईल वापरणे टाळत होता. तसेच डोक्यावर विग घालून वावरत होता. अखेर ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने आसामध्ये जाऊन वेशांतर करत त्याला ताब्यात घेतले. त्याच्या अटकेमुळे मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे आयुक्तालयात दाखल असलेल्या २२ गुन्ह्यांची उकल झाली आहे. तसेच त्याच्याकडून ६२ लाख २४ हजार रुपयांचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात घरफोडी आणि चोरींच्या गुन्ह्यात वाढ झाली आहे. त्यामुळे ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी सर्व अधिकाऱ्यांना गुन्हे उघडकीस करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या भिवंडी कक्षामार्फत शोध सुरू झाला. साहाय्यक पोलीस आयुक्त निलेश सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांनी साहाय्यक पोलीस निरीक्षक धनराज केदार, पोलीस हवालदार अमोल देसाई, पोलीस नाईक सचिन जाधव, पोलीस शिपाई भावेश घरत आणि अमोल इंगेळ यांचे विशेष पथक स्थापन केले. भिवंडीतील नारपोली येथे एका घरफोडीच्या प्रकरणाचा तपास पथकाकडून सुरू होता. त्यावेळी यातील आरोपी मोईनुल हा आसाम किंवा नागालँडमध्ये वास्तव्यास असून तो चोरी करण्यासाठी विमानाने मुंबईत येतो. चोरी झाल्यानंतर तो पुन्हा आसाम किंवा नागालँड येथे विमानाने जातो अशी माहिती खबऱ्यांनी दिली. तसेच तो मोबाईल देखील वापरत नव्हता. त्यामुळे त्याला आसाममध्ये जाऊन अटक करण्याचा निर्णय पोलिसांनी घेतला. पोलिसांचे पथक आसाममध्ये गेले. येथील सामरोली गावाजवळील नदी किनारी तो वास्तव्यास असल्याची माहिती पथकाला मिळाली.

# तरुणीवर अत्याचार करून ठार मारण्याचा प्रयत्न

## उरणमध्ये एक जण अटकेत

■ **नवी मुंबई** : उरण परिसरात राहणाऱ्या एका व्यक्तीने त्याच्या ओळखीतील २५ वर्षीय तरुणीचे फोटो व व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे या आरोपीने सदर तरुणीच्या स्कू टीला मोटारसायकलने धडक देऊन तिच्यावर लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला केल्याचेही उघडकीस आले आहे. उमेश सरोज (३६) असे या आरोपीचे नाव असून, उरण पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

या प्रकरणातील पीडित तरुणी व तिच्यावर लैंगिक अत्याचार करणारा आरोपी उमेश सरोज या दोघांची गत तीन-चार वर्षांपूर्वी कामाच्या निमित्ताने ओळख झाली होती. त्यानंतर त्यांच्यामध्ये मैत्री वाढल्यानंतर आरोपी उमेश सरोज याचे पीडित तरुणीच्या घरी येणे-जाणे सुरू झाले होते. त्यानंतर त्यांच्यामध्ये प्रेमसंबंध निर्माण झाल्यानंतर आरोपी उमेश सरोज याने पीडित तरुणीसोबत काढलेले फोटो व व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन तिच्यावर जबरदस्तीने अनेक वेळा लैंगिक अत्याचार केले. य

ादरम्यान आरोपी उमेश सरोज याने पीडित तरुणीकडून खर्चासाठी काही रक्कम सुद्धा घेतली. सदर रक्कम पीडित तरुणीने मागण्यास सुरुवात केल्यानंतर उमेशने तिला अश्लील भाषेत शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली. ३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास पीडित तरुणी आपल्या स्कूटीवरून जात असताना, तिला मारून टाकण्याच्या उद्देशाने आरोपी उमेश सरोज याने पीडित तरुणीच्या स्कूटीला आपल्या मोटारसायकलची धडक दिली. पीडित तरुणी खाली पडल्यानंतर उमेशने तिच्यासोबत भांडण करून तिच्या डोक्यामध्ये लोखंडी रॉडने हल्ला करून पलायन केले होते. या हल्ल्यात पीडित तरुणी गंभीर जखमी झाल्याने तिच्या डोक्याला १० टाके पडले. पीडित तरुणीने रुग्णालयात उपचार घेतल्यानंतर गत शनिवारी उरण पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी उमेश सरोज याला बलात्कार आणि जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी अटक केली आहे. न्यायालयाने त्याची चार दिवसांच्या पोलीस कोठडीत रवानगी केल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक अमोल खाडे यांनी दिली.

# मुंबई विमानतळावर ४.८१ कोटींचे सोने जप्त

■ **मुंबई** : मुंबई सीमाशुल्क विभागाने छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर गेल्या दोन दिवसांत ४.८१ कोटी किमतीचे ८.१ किलोपेक्षा जास्त सोने जप्त केले आणि ६ जणांना अटक केली. मुंबई सीमाशुल्क विभाग-३ च्या विमानतळ आयुक्तालयाच्या अधिकाऱ्यांनी शनिवार आणि रविवारी विमानतळावर उतरलेल्या प्रवाशांच्या विशिष्ट माहितीच्या आधारे ही कारवाई केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. कपड्यांमध्ये आणि खासगी भागांमध्ये सोने लपवून ठेवलेल्या ६ प्रवाशांना अटक करण्यात आली आहे. बारा वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये ४.८१ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे ८.१ किलोपेक्षा जास्त सोने जप्त करण्यात आले आहे. तर दुसऱ्या प्रकरणात एका प्रवाशाने गुदद्वारात अंडाकृती कॅप्सुलमध्ये सोन्याचे मेण लपवले होते, तर आणखी एका प्रकरणात, प्रवाशाच्या शरीरावर सोन्याची चेन, रोडियम-प्लेटेड पेंडेंट आणि लॉकेट सापडले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण व बलात्कार करणाऱ्या बिहारमधील नराधमाला अटक

■ **मुंबई** : गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात १५ वर्षीय मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार केल्याप्रकरणी बिहारमधून एका व्यक्तीला अटक करण्यात आली. पोलिसांना आणि पीडितेच्या नातेवाईकांना शक्य असल्यास मला पकडून दाखवा, असे या ३० वर्षांच्या आरोपीने आव्हान दिले होते, अशी माहिती आरसीएफ पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्याने दिली.

नरेश रामाशिष राय असे या आरोपीचे नाव आहे. नरेश हा सिमकार्ड बदलून नेपाळ तसेच दिल्ली, बिहार आणि काठमांडू येथे लपून बसला होता. मुलगी बेपत्ता झाल्यानंतर, तिच्या नातेवाईकांनी पोलिसांशी संपर्क साधला. राय हा नजीकच्या कपड्याच्या कारखान्यात काम करतो व त्याचा थांगपत्ता लागत नसल्याचे चौकशीत आढळून आले.

एक पथक बिहारमधील त्याच्या मूळ सीतामढी गावात गेले, पण तेथेही तो सापडला नाही. एका पथकाने पूर्वेकडील राज्याच्या अमितापुरा भागात दोन दिवस शोध घेतला आणि माधवपुरा सुस्ता येथून रायला पकडण्यात यश आले. मुलगी त्याच्यासोबत राहत असल्याचे आढळून आल्याचे पोलिसांनी सांगितले. मुलीला तिच्या पालकांकडे सुपूर्द करण्यात आले आहे. राय याच्यावर पॉस्को कायद्यांतर्गत अपहरण, बलात्कार आणि इतर गुन्ह्यांचा आरोप असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

## सर्व्हिस रोडवर पादचाऱ्याला लुटले

■ **ठाणे** : कामावरून सुटल्यानंतर रहेजा सर्कल येथून सर्व्हिस रोडने पायी जाणाऱ्या अनुप शशी नायर(२९) या तरुणाला दोन अज्ञातपैकी एकाने चाकूचा धाक दाखवून पैशाची मागणी केली. पाकिटात पैसे नसल्याचे दाखविताच लुटारूंनी बोटातील अंगठी आणि सोनायची चैन असा २८ हजाराचा मुद्देमाल घेऊन पोबारा केला. या प्रकरणी तक्रारदार यांनी वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात चार अज्ञाताच्या विरोधात लुटीचा गुन्हा नोंदवला. अनुप शशी नायर रहेजा सर्कल सर्व्हिस रोडने जाताना त्यांच्या समोरून दोन आणि पाठिमागून दोन आलेल्या अज्ञातांनी चाकूच्या धाकावर पैशाची मागणी केली.

# आगीत २० गोदाम जळून खाक



**भिवंडी** : मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडी तालुक्यातील वाहुली गावाच्या हद्दीत असलेल्या पत्र्याच्या मदतीने बनवण्यात आलेल्या गोदामांना सोमवारी मध्यरात्री भीषण आग लागण्याची घटना घडली. आगीने रौद्र रूप धारण केल्याने सुमारे २० गोदाम जळून खाक झाली आहेत. पडघा पोलिसांनी आगीची माहिती दिल्याने भिवंडी व कल्याण अग्निशमन दलाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल होत जवानांनी आग आठ तासांत नियंत्रणात आणली. ग्रामीण भाग असल्याने आग विझवण्यासाठी पाण्याची कमतरता भासत असल्याने मंगळवारी सकाळी ८ पर्यंत आग धुमसत होती. आगीचे कारण अस्पष्ट आहे. कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली आहे. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवानांना शर्थ करावी लागली. पोलिसांनी या घटनेची नोंद घेऊन तपास सुरू केला आहे.

## भोईवाडा अत्याचार प्रकरणात आरोपीला १० वर्षे कारावास

■ **मुंबई** : अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण करणाऱ्या तरुणाला दोषी ठरवत विशेष पॉक्सो न्यायालयाने त्याला १० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. तसेच आरोपीला १० हजार रुपयांचा दंड भरण्याचा आदेशही दिला आहे. सिद्धेश गडकरी असे या आरोपीचे नाव आहे. भोईवाडा परिसरात राहणाऱ्या एका पीडित मुलीच्या वडिलांचे निधन झाल्यानंतर घरात कर्ता पुरुष नसल्याचा गैरफायदा घेत आरोपी सिद्धेशने जुलै ते ऑगस्ट २०१७ मध्ये पीडितेवर वारंवार जबरदस्तीने अत्याचार केले. त्याचे आक्षेपार्ह फोटोही इन्स्ट्राग्रामवर प्रसिद्ध केले. याबाबत कुठे वाच्यता केल्यास पीडितेला ठार मारण्याची धमकीही त्याने दिली. अखेर पीडितेच्या आईने याप्रकरणी भोईवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी १७ ऑक्टोबर २०१८ रोजी सिद्धेशला अटक केली. त्यानंतर चार महिन्यांत जामिनावर सुटलेल्या सिद्धेशच्या खटल्याची न्यायाधीश एस. सी. जाधव यांच्यासमोर सुनावणी झाली. यावेळी सरकारी वकील ॲड. वीणा शेलार यांनी सबळ पुराव्यांसह अनेक साक्षीदार तपासून सिद्धेशचे दोषत्व सिद्ध केले. त्याची गंभीर दखल घेत न्यायालयाने सिद्धेशला १० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.

## गावठी कट्टा बाळगणारा गजाआड

■ **ठाणे** : आमराई नगरात बेकायदा प्राणघातक शस्त्र बाळगणाऱ्या २१ वर्षीय तरुणाला चितळसर पोलिसांनी सोमवारी रात्री अटक केली. त्याच्या विरोधात चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अजय दिलीप निर्मल याच्याकडे प्राणघातक शस्त्र असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार चितळसर पोलिसांनी रात्री १२.३० च्या सुमारास नळपाडा तबेल्याजवळ अजयला ताब्यात घेऊन त्याची अंगझडती घेतली. यात त्याच्याकडून देशी बनावटीचा कट्टा आणि एक जिवंत काडतूस हस्तगत करण्यात आले. चितळसर पोलीस ठाण्यात बेकायदा शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून अजय निर्मल यास अटक करण्यात आली.

## घरात अडकलेल्या मनोरुग्ण महिलेची सुटका


■ **ठाणे**: ठाण्याच्या हाजूरी परिसरातील एकोलेट सोसायटीत चौथ्या माळ्यावर प्लॅटचा दरवाजा लॉक झाल्याने एक मनोरुग्ण महिला अडकली होती. घटनास्थळी वागळे पोलीस अधिकारी, कर्मचारी व आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी धाव घेत मनोरुग्ण महिलेची सुखरूप सुटका केली. ही घटना रविवारी सकाळी घडली. रविवारी सकाळी ठाण्याच्या हाजुरी येथील एलआयसी मुख्यालया जवळ, ७ मजली इमारतीमधील ४ थ्या मजल्यावर राहणाऱ्या सतीश वेलगेकर यांच्या घराचा मुख्य दरवाजा लॉक होऊन आत एक मनोरुग्ण महिला अडकली होती.

# मोखाड्यात पाणीटंचाईच्या लागल्या झळा

## ९ विहिरींना ३ टँकरद्वारे पाणीपुरवठा

■ **मोखाडा** : मोखाडा तालुक्यातील गावापाड्यांनी पाणी टंचाईचा उच्चांक गाठला असतानाच आता मोखाडा नगरपंचायत प्रभागात ही पाणीटंचाईला सुरुवात झाली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी आता टँकरच्या पाण्याचा आधार घ्यावा लागत आहे. तर एक दिवसाआड वापरावयाच्या पाण्याचा पुरवठा होत असतानाच आता ते पाणीही गढूळ यायला लागल्याने शहरवासीयही पाणीटंचाईच्या दुष्ट चक्रात अडकल्याचे दिसून येत आहे. यामुळे पाणीटंचाई आणि मोखाडा यांचे नाते काही केल्या संपण्याचे नाव घेत नसल्याचे समोर येत आहे. मोखाडा नगरपंचायत क्षेत्रातील तब्बल ९ विहिरींनी तळ गाठला आहे. पिण्याच्या पाण्यासाठी फक्त विहिरींवर अवलंबून असलेल्या शहरवासीयांना टँकरचे पाणी प्यावे लागत आहे. यामुळे सर्दी, खोकला, ताप या आजारांतही वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

मोखाडा नगरपंचायत ही शहर आणि १२ पाड्यांत विभागलेली आहे. यामुळे शहरातील दोन ते तीन विहिरींना याशिवाय घोसाळी, माळीपाडा, वारघडपाडा, आंबेपाना, मोरखडक, तेलीपाडा या पाड्याना टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. मोखाडा



शहराला नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वित आहे, मात्र जलशुद्धीकरण यंत्रणा नसल्याने नळाद्वारे येणारे पाणी हे फक्त वापरण्यासाठी वापरले जाते. सदर योजना अतिशय जुनी असल्याने विभागनिहाय एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो. अशातच आता या उद्भावाचा पाणीसाठा कमी झाल्याने नळाद्वारे ही गढूळ पाणी यायला सुरुवात झाल्याने वापरावयाचे पाणीसुद्धा शुद्ध यायला लागले आहे. यामुळे एप्रिल महिन्यात अशी परिस्थिती निर्माण झाल्याने मे महिन्यात पाणीटंचाई शिगेला पोहचण्याची भीती व्यक्त होत असून, नागरिकांत चिंता व्यक्त केली जात आहे. एकूणच मोखाडा शहरातील पाणीटंचाईला कायमस्वरूपी नष्ट करण्यासाठी ३४ कोटींची नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर होऊन त्यांच्या कामालाही सुरुवात झाली आहे. मात्र हे काम पूर्ण होण्यासाठी किमान अजून वर्षभराचा अवधी लागणार आहे. यामुळे पुढील वर्षीही अशाच पाणी टंचाईचा सामना मोखाडा शहराला करावा लागणार आहे. तर मोखाडा गावपाड्याची स्थितीही अशीच असून, जलजीवन मशीन अंतर्गत सुरू असलेल्या कामांना पूर्ण होण्यास अजून वर्ष लागणार आहे. त्याच वेळी तिच्या यशस्वीतेबद्दल संशय व्यक्त होत आहे. यामुळे पाणीटंचाईचे समूळ उच्चाटन होईल का, हाच मुळात



### पाणीटंचाईचा ग्रामीण रुग्णालयाला फटका

मोखाडा शहरातील एका विहिरीवरून मोखाडा ग्रामीण रुग्णालयाला पाणीपुरवठा होत आहे. मात्र त्याच विहिरीतील पाणीसाठा कमी झाल्याने त्यानाही पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. अशावेळी आम्हालाही दररोज एक टँकर मिळावा, अशी मागणी त्यांनी नगरपंचायतीकडे केली आहे. यामुळे ग्रामीण रुग्णालयालाही पाणीटंचाईचा फटका बसला आहे. ग्रामीण असो की शहर, तालुक्यात पाणीबाणीसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे हे नक्की.

# खारप्रतिबंधक बंधाऱ्यांची डागडुजी रखडली

■ **अलिबाग,** समुद्राला सततच्या येणाऱ्या उधाणाचे पाणी भातशेतीत शिरून गेल्या काही वर्षांत जिल्ह्यातील तीन हजार १६ हेक्टर शेती कायमची नापीक झाली आहे. यावर उपाय म्हणून दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करून खारप्रतिबंधक बंधाऱ्यांची दुरुस्ती केली जाते. यंदा मात्र सुरू असलेल्या आचारसंहितांमुळे बांधबंधिस्तीची कामे रखडण्याची शक्यता आहे. ही कामे वेळेत पूर्ण न झाल्यास यंदा किनारपट्टीलगतच्या शेतकऱ्यांना उधाणाचा तीव्र फटका लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कोकण सौम्यीकरण योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यातील ४५ जुन्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी २१ कोटी २२ लाखांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. मात्र, त्यास मंजुरी मिळून कामास सुरुवात झालेली नाही. सध्या सुरू असलेली आचारसंहिता जून महिन्यापर्यंत कायम राहणार असल्याने यादरम्यान मंजुरी आणून कामे सुरू करण्यास विलंब लागणार आहे. रायगड जिल्ह्यात उरण, पेण, अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, म्हसळा या तालुक्यात खारभूमीच्या एकूण १५६ योजना आहेत. यातून २२ हजार ७४९ हेक्टर क्षेत्र समुद्राच्या पाण्यापासून संरक्षित होणे आवश्यक होते; मात्र तसे न झाल्याने अलिबाग तालुक्यातील बहिरीचापाडा, मानकुळे, धेरंड-शहापूर आदी गावे समुद्र गिळंकृत करू पाहत आहे. गणेशपट्टी हे गाव यापूर्वीच समुद्राने गिळंकृत केले. त्यामुळे खारभूमी क्षेत्रासाठी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याची मागणी केली जाते आहे. समुद्राला येणाऱ्या उधाणापासून शेतजमिनीचे रक्षण व्हावे, यासाठी किनारपट्टीवरील भागात खारबंदिस्ती घातली जाते. या बांधबंदिस्तीच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी खारभूमी विभागाकडे असते; मात्र खारभूमी विभाग या बंदिस्तीची योग्य देखभाल करत नाही. उधाणामुळे अनेकदा खारबंदिस्तीला तडे जाण्याचे प्रकार घडतात. यामुळे उधाणाचे पाणी लगतच्या शेतात तसेच परिसरात शिरून जमीन नापीक होण्याचा धोका संभवू लागला आहे. तीन हजार हेक्टर जमीन नापीक रायगड जिल्ह्यात २१ हजार २९६ हेक्टर खारभूमी क्षेत्र आहे. यात अलिबाग तालुक्यातील सात हजार ६१३ हेक्टर जमिनीचा समावेश आहे. यातील तीन हजार १६ हेक्टर जमीन उधाणाच्या पाण्यामुळे कायमची नापीक झाली आहे. माणकुळे, बहिरीचा पाडा, हाशिवरे, कावाडे, सोन कोठा, रांजणखार डावली, मेढेखार, देहेण कोटी यांसारख्या गावांना खारबंदिस्तीची योग्य देखभाल न केल्याचा मोठा फटका बसला आहे. कोकण सौम्यीकरण योजनेतून रायगड जिल्ह्यातील नवीन व जुन्या खारबांधाच्या नूतनीकरणासाठी २१ कोटी रुपयांचा आराखडा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला होता; परंतु त्यास अद्याप मंजुरी मिळालेली नाही.